# प्राथमिक शिक्षण पदविका

## (डी. ई. एल. इडी)

## पाठ्यक्रम - 501

## प्राथमिक शिक्षणातील अध्यापन शास्त्रीय प्रक्रिया

## गट - 3

## भारतातील प्राथमिक शिक्षण एक आव्हान - II

**NATIONAL INSTITUTE OF OPEN SCHOOLING**

A – 24/25, Institutional Area, Sector – 62, NOIDA

Gautam Buddha Nagar, UP – 201309

Website : www.nios.ac.in

**(श्रेयांक 8 = 6 + 2)**

| गट | घटक | घटकाचे नाव | लेखी परीक्षा तासिका | | प्रॅक्टिकल |
|---|---|---|---|---|---|
| | | | आशय | उपक्रम | |
| **गट–1 :** भारतातील प्राथमिक शिक्षण अवलोक | **घटक 1** | भारतीय शिक्षण पद्धती I | 4 | 2 | प्राचीन गुरू आणि आजचे व्यावसायिक शिक्षक यांची तुलना |
| | **घटक 2** | भारतीय शिक्षण पद्धती II | 5 | 3 | कोणत्याही पाठ्यपुस्तकाचे मूल्यमापन |
| | **घटक 3** | शिक्षण हा मूलभूत हक्क | 4 | 2 | RTE 2009 च्या नियमावलीप्रमाणे शिक्षकांची भूमिका आणि जबाबदारीचे मूल्यमापन |
| | **घटक 4** | संघटनांचे स्वरूप | 4 | 2 | झारखंडमधील प्राथमिक शिक्षणाची रचना |
| **गट–2 :** भारतातील प्राथमिक शिक्षण | **घटक 5** | UEE - I रचना | 5 | 3 | – |
| | **घटक 6** | UEE - II सर्वशिक्षा अभियान (SSA) | 5 | 3 | शाळांमधील मध्यांन्ह पोषण आहार कार्यपद्धती |
| | **घटक 7** | UEE नियोजन व व्यवस्थापन | 6 | 3 | – |
| **गट–3 :** भारतातील प्राथमिक शिक्षण | **घटक 8** | प्राथमिक शिक्षण शिक्षकांची तयारी | 6 | 3 | विचारशील शिक्षक म्हणून आपली गुणवत्ता |
| | **घटक 9** | | 5 | 3 | आपल्या भागातील अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्यांक मुलांना शाळेत प्रवेश देणे, मुले टिकवून ठेवणे यासारख्या प्रश्नावर विचार विनिमय मुलांचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी आपली योजना |
| | **घटक 10** | प्राथमिक शिक्षणाची जगभरची स्थिती | 5 | 2 | |
| | | **ट्युटोरिअल** | 15 | - | |
| | | **एकूण** | 64 | 26 | 30 |
| | | **एकूण बेरीज** | **64 + 26 + 30 = 120 तास** | | |

# *गट* - 3

# *भारतातील प्राथमिक शिक्षण एक आव्हाण* – II

**गटातील घटक**

**घटक 8 :** प्राथमिक शिक्षण शिक्षकांची तयारी

**घटक 9 :** प्राथमिक शिक्षणापासून वंचितांसाठी

**घटक 10 :** आंतरराष्ट्रीय प्राथमिक शिक्षणाचे चित्र

## प्रस्तावना

सदर विभागात 8, 9, 10 घटक आहेत. या घटकांमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या पूर्व प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तरावरील शिक्षकांच्या तयारीचा भाग असून राष्ट्रीय पातळीवरील शिक्षकांच्या गुणवत्तेची तयारी होऊ शकेल.

**घटक 9 :** मध्ये शाळेत पहिल्यांदा येणाऱ्या शिक्षणाच्या संदर्भात असून शिक्षकांना प्रेरणा देणारा घटक आहे. सदरच्या घटकामधून वंचित मुलांच्या शिक्षणाचा संदर्भात आपणास माहिती मिळेल.

**घटक 10 :** जगातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती या भागामधील अभ्यासता येईल.

# पाठ्यक्रम


| अ.नं. | घटकांचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | घटक – 8 : प्राथमिक शिक्षकाची अध्यापन तयारी | 1 |
| 2. | घटक – 9 : वंचित मुलांसाठी शिक्षकांची तयारी | 22 |
| 3. | घटक – 10 : प्राथमिक शिक्षणाची जागतिक स्थिती | 38 |

# घटक 8 : प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण तयारी

Notes

## पाठ्यरचना


8.0 प्रास्तावना
8.1 अध्ययन उद्दिष्ट्ये
8.2 अध्यापन शास्त्र : प्राथमिक उच्च प्राथमिक शिक्षण
8.3 (NCF) 2005 धोरण प्राथमिक शिक्षण
8.3.1 NCF 2005 प्रमुख वैशिष्ट्ये
8.3.2 सेवापूर्व प्रशिक्षण
8.3.3 सेवांर्तगत प्रशिक्षण
8.3.4 विशेष गरजा असणाऱ्यांसाठी शिक्षक प्रशिक्षण
8.3.5 प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम
8.3.6 प्रशिक्षण संस्थेतील सुविधा
8.3.7 शिक्षक भरती प्रक्रिया
8.4 राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण
**स्तर I शिक्षक प्रशिक्षण (प्राथमिक I ते V)**
8.4.1 तर्क
8.4.2 अ प्रशिक्षण आशय
8.4.3 प्रशिक्षण
8.4.4 अभ्यासक्रम
8.4.5 प्रशिक्षक शिक्षकाची भूमिका
8.4.6 मूल्यमापन
8.4.7 मूल्यमापन साधने
**स्तर II शिक्षक प्रशिक्षण (प्राथमिक I ते VIII)**
8.4.8 तर्क
8.4.9 प्रशिक्षण आशय
8.4.10 प्रशिक्षण
8.4.11 अभ्यासक्रम
8.4.12 प्रशिक्षक शिक्षकाची भूमिका
8.4.13 मूल्यमापन
8.4.14 मूल्यमापन साधने
8.5 प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण नमुना
8.5.1 प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण स्थिती
8.5.2 प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण सुधारणा
8.5.3 नवीन नमुन्याची गरज
8.5.4 नवीन पुढाकार
8.6 शिक्षक रिफ्लेक्टिव्ह पार्टनर
8.6.1 अर्थ : प्रतिबिंब
8.6.2 शिक्षण शास्त्रज्ञांचे मत

Notes

8.6.3 मूळ प्रतिकृती
8.6.4 प्रतिबिंब
8.6.5 आधुनिक संकल्पना
8.6.6 झेइचनर आणि लिस्टनचे मॉडेल
8.6.7 प्रतिबिंब पद्धती
8.7 सारांश
8.8 संक्षिप्ते व संदर्भ
8.9 नमुना उत्तरे व आपली प्रगती
8.10 संदर्भ ग्रंथ
8.11 पाठावरील प्रश्न

## 8.0 प्रस्तावना

भारतीय शिक्षण पद्धतीबद्दल मागील प्रकरणात माहिती मिळविली. विविध पातळीवर शिक्षण देणाऱ्या विविध संस्था कार्य करीत आहेत. शिक्षण हा मूलभूत हक्क आहे. RTE शिक्षणाचा हक्क ही घटनात्मक तरतूद असून यानुसार वयाच्या 14 वर्षापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षणाची तरतूद आहे. इयत्ता पहिलीपासून आठवीपर्यंत म्हणजे प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षणाचा त्यात समावेश आहे. त्या दृष्टीने प्राथमिक शिक्षकांना शिक्षक प्रशिक्षणार्थींना हा भाग महत्त्वाचा आहे.

सदर प्रकरणामध्ये शिक्षक प्रशिक्षणाबद्दल माहिती मिळवू. यामध्ये कोणते कार्यक्रम आहेत. प्रत्येकजण राष्ट्रीय उद्दिष्टांमध्ये कशा प्रकारे सहभागी होईल? त्यासाठी प्राथमिक स्तरावर उत्तम शिक्षक निर्माण करण्याचा उद्देश आहे.

## 8.1 अध्ययन उद्दिष्ट्ये

**पाठ्य अभ्यासानंतर आपण कोणत्या गोष्टी संपादन कराल.**

- शिक्षण शास्त्रानुसार कनिष्ठ प्राथमिक व वरिष्ठ प्राथमिक शिक्षणाची तत्त्वे अभ्यासणे.
- NCF 2005 च्या धोरणानुसार प्राथमिक शिक्षणावर भर देण्याची कारण
- संबंधित बाबींचा सहसंबंध समजणे.
- NCFTE 2009-10 शैक्षणिक धोरणानुसार प्राथमिक शिक्षणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
- निरनिराळ्या प्रतिकृती स्पष्ट करणे.
- संबंधित संकल्पनांचे पृथ:करण करणे.
- संबंधित अभ्यासक्रमानुसार प्रत्यक्ष कार्यामध्ये त्याचे परावर्तन करणे.

## 8.2 प्राथमिक आणि वरिष्ठ प्राथमिक शिक्षणातील शिक्षणशास्त्र

शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांची निर्मिती ही लिंगभेद, जातीयता, भाषा, संस्कृती, धर्म अपंगत्व यामुळेच निर्माण होते. यासाठी केवळ धोरण किंवा योजना सांगून उपयोग होणार नसून अध्यायनातील समावेशामुळे प्राथमिक स्तरावरील शिक्षणामुळे विषमता दूर होईल.

अभ्यासक्रम तयार करताना समृद्ध सांस्कृतिक वारसा, विविधता याबद्दल UEE ने काळजी घेतलेली आहे. मुलांमध्ये सर्जनशीलता प्रारंभीपासून निर्माण व्हावी आत्मसन्मान निर्माण व्हावा याला प्राधान्य दिलेले आहे.

## प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण तयारी



प्राथमिक शिक्षक प्रशिक्षणामध्ये पुढील गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे.

- **अभ्यासक्रम रचना :** अभ्यासक्रम तयार करताना काही नवीन बदल केलेले आहेत. हा प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेत येवून अनुभूती मिळणे तसेच शिकण्याची खात्री वाटली पाहिजे. अभ्यासक्रम तयार करताना सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण याचे प्रतिबिंब दिसले पाहिजे. त्यामध्ये फक्त सांस्कृतिक विविधताच नाही तर विविध सामाजिक, आर्थिक, प्राकृतिक मानसशास्त्रीय बौद्धिक गुणवैशिष्ट्ये असणारांना प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे तरच प्राथमिक शिक्षणाला यश मिळाले असे म्हणता येईल.

- **पद्धतशीर सुधारणा :** आपल्या देशातील शिक्षण पद्धतीमध्ये क्रमीक पुस्तकातील अभ्यासातून लिहिलेल्या उत्तरावर भर आहे परंतु विद्यार्थ्याच्या वर (mugged up) घेतल्या जाणाऱ्या चाचण्यातून गुणवत्ता ठरते. समाजसुद्धा परीक्षेतील गुणांना प्रोत्साहन देते. प्रत्यक्षात त्याला शिकलेला भाग प्रत्यक्षात दैनंदिन जीवनात किती वापरतो याला महत्त्व देत नाही. तसं पहाता विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास व्हायला हवा. व्यक्तिगत सामाजिक भावनिक बाबीही विचारात घ्यायला हव्यात. प्रत्येक घटकाचा  व्यक्तिगत जीवनावर परिणाम होतो. खरी गरज आहे ती म्हणजे मूल्य आणि तत्त्व ही केंद्रस्थानी असली पाहिजेत. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांचे करीअर व आयुष्यावर होतो.

- **पंचायतराज संस्था (PRI) :** अशा संस्थांना सरकारी दप्तरात न अडकता शिक्षण थेट कामाशी संबंधित असले पाहिजे. मुलांसाठीच शाळा या दृष्टीने स्वातंत्र्य आणि जबाबदारी असली पाहिजे. विकेंद्रीकरणामध्ये पंचायतराजची जोर लावून परिस्थिती बदलली पाहिजे. मुलांना विविध कौशल्य नैसर्गिकरित्या संपादन करता येतात. फक्त त्यांना परिस्थिती निर्माण करून देण्याची गरज असते. त्यांची निरीक्षण शक्ती चांगली असते. त्यांना जेव्हा काही प्रश्न असतात तेव्हा ते शिक्षकाकडे जातात तेव्हा अभ्यासक्रम हा परिपूर्ण होईल आणि मुले अधिक सर्जनशील बनतील. हा बदल जो जो आहे तो लक्षात घेऊन अभ्यासक्रमाच्या तत्त्वानुसार ज्ञाताकडून अज्ञाताकडे known to the unknown किंवा concrete to abstract आणि Local to global अशा स्वरूपाचा अभ्यासक्रम होईल.

- **निर्णायक शिक्षण शाळा (Critical pedagogy) :** शिक्षण हे वैयक्तिक विकासाचे साधन असून लोकशाहीला बळकटी देणारे आहे. समजाच्या विकासाचे साधन आहे. शिक्षणाची चळवळ ही ज्ञानाच्या आधारावर भक्कम निर्णय घेवू शकणारी क्षमता विकसित करणारी यंत्रणा आहे. शिक्षण शास्त्रामध्ये अध्यापन अध्ययन संबंधाला महत्त्व आहे. या प्रक्रियेमध्ये Unlearning, Learning and relearning, reflection and evaluation असे चक्र असून या सर्वांचा परीणाम विद्यार्थ्यांच्या कृतीवर होतो.

- **अभ्यासक्रमाचा संबंध :**

- **पर्यावरण रक्षण :** ही नव्याने निर्माण झालेली बाब असून आधुनिक तंत्र आणि जीवन पद्धती यांच्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे गेल्या शतकापासून दिसून येत आहे. त्याचे लाभ आणि तोटे यामध्ये तफावत खूप वाढत आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे. त्यासंबंधी जाणिव निर्माण करणे. ही शिक्षणातील महत्त्वाची बाब आहे. NPE 1986 च्या धोरणामध्ये पर्यावरण हा गाभा आहे. (सर्व स्तरावर) त्यामुळे मुलांमधील संवेदना विकसीत करणे यासाठी शालेय अध्ययनातून जीवनाकडे पाहण्याचे शिक्षण दिले जावे.

- **शांततेत शिक्षण :** आपण सध्या अविचारी आणि अशांत वातावरणात राहतो. स्थानिक असो किंवा अगदी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय असो. नैसर्गिक अथवा सामाजिक ताणाच्या पर्यावरणाचा परिणाम हा मानवी संबंधावर होतो. शांततेमध्येच प्रतिध्वनी ऐकू येतो. त्याप्रमाणे शिक्षणासाठी


Notes

व्यक्तिगत विकासासाठी शांत जीवनपद्धती असेल तरच शिक्षणाचे सबलीकरण होईल म्हणून निष्क्रिय न राहता त्यामध्ये पुढाकार घ्या.

- **लोकशाही जीवनपद्धती :** भारतीय राज्य घटनेने न्याय, समता व स्वातंत्र्याची हमी प्रत्येक नागरिकाला दिलेली आहे. प्रत्येकाला व्यक्तिगत स्वातंत्र्य दिलेले आहे. तसेच इतरांनाही अधिकार आहे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. शाळेतील मुलांवर हे शिक्षणाच्या माध्यमातून बिंबवणे आवश्यक आहे. प्रत्येकाच्या धर्माचा आदर करणे हा त्यातील एक भाग आहे. आपल्या परंपराच्या सन्मान करणे, राष्ट्रीय ओळख यासाठी मुलांच्या अभ्यास क्रमामध्ये भूतकाळाचे पुन:रावलोकन, पुन:मूल्यांकन करणे व समाजाचा बदललेला दृष्टीकोन याला प्राधान्य दिले पाहिजे. घटनेने घालून दिलेले हक्क आणि अधिकार याचे प्रतिबिंब नागरिक म्हणून शिक्षणातून विद्यार्थ्यांपर्यत पोहचले पाहिजेत.
- **शिक्षणशास्त्राया दृष्टीकोनातून :** अभ्यासक्रमामध्ये 80% शिक्षणशास्त्र आहे. विद्यार्थी केंद्रित अभ्यासक्रमावर भर असून कृतीला वाव व सहकार हा दृष्टीकोन आहे. शिक्षक अध्यापनामध्ये पाठाच्या आशयाबरोबरच अभ्यासक्रमाची उद्दिष्टेही महत्त्वाची आहेत. गुणवत्ता प्रधान शिक्षणामध्ये जीवनाचा दर्जा विविध अंगाने व्हावा हा हेतू आहे. पर्यावरण रक्षण, शांतताप्रिय, लोकशाहीप्रधान, सामाजिक परिवर्तन हे गुणवत्तेचे निकष आहेत. विशाल दृष्टीकोन निर्माण व्हावा यासाठी पाठ्यपुस्तके ही प्रतिनिधीक आहेत. मानवता आणि राष्ट्र या विशाल दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तकाकडे पाहिले जावे. कोणतेही पाठ्यपुस्तक यापेक्षा वेगळे असता कामा नये त्यामुळे सामाजिक आर्थिक सांस्कृतिक उद्दिष्टाच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकात अभ्यासक्रम असला पाहिजे.

**कृती 1**

कल्पना करा की सदरच्या चित्रामध्ये तुम्ही आहात त्यावरून तुमच्या प्रतिक्रिया काय?




**खालील मुद्दे नियोजन व कार्यवाहीसाठी उपयुक्त**

- वर्गातील ज्ञानाचा बाह्यज्ञानाशी सांगड घाला.
- पाठांतरावर भर देणे ही संकल्पना बदलली
- पुस्तक केंद्रित अभ्यासक्रमाऐवजी सर्वांगिन विकासावर भर
- परिक्षांमध्ये लवचिकता ठेवा.
- देशाच्या लोकशाही प्रधान धोरणाचा मुलांच्या संगोपनात वापर करा.
- समाजातील मागे राहणाऱ्या घटकाला संधी द्या.


Notes

## 8. 3 (NCF) 2005 चे प्राथमिक शिक्षण विषयक धोरण

NCF 2005 च्या धोरणानुसार शालेय अभ्यासक्रम, पाठ्य पुस्तके, अध्यापन प्रक्रीया याबाबत आराखडा दिलेला आहे. तणाव विरहित अध्ययन हे धोरण आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986 आणि 1992 च्या अहवालामध्ये त्याचा समावेश आहे. NCF 2005 संपूर्ण शैक्षक्षिक धोरण आहे. त्यात अनेक शिफारशी आहेत.

### 8.3.1 NCF 2005 प्रमुख वैशिष्ट्ये

पाच भागात विभाजन





भारतीय लोकसभेत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण कायदा 'शिक्षणाचा हक्क' 2009 मंजूर केलेला असून प्राथमिक शिक्षण प्रत्येक मुलाला सक्तीचे आणि मोफत वय वर्षे 6 ते 14 या वयोगटाला मिळाले पाहिजे हा कायदा 1 एप्रिल 2010 मध्ये लागू करण्यात आला. याबाबत घटनात्मक तरतुदी बाबतची माहिती मागील प्रकरणात पाहिलेली आहे.

प्राथमिक शिक्षणावर जो भर आहे तो म्हणजे 1) सुलभ प्रवेश 2) वय वर्षे 14 पर्यंत सर्वांना प्रवेश 3) मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठी, आवश्यक ती पातळी आणण्यासाठी प्रयत्न

प्राथमिक शिक्षक म्हणून NCF धोरणाबाबतच्या तुमच्या जाणीवा.

- शैक्षणिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी शाळा काय करणार?
- उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शैक्षणिक अनुभूती कशी देणार?
- शैक्षणिक अनुभूती विधायक स्वरुपात कशी वापरणार?
- शैक्षणिक उद्देश कशा प्रकारे सिद्ध करणार?
- त्यासाठी काही तरतूदी पुढीलप्रमाणे

**शिक्षक प्रशिक्षण**




**आकृती 2**

### 8.3.2 सेवापूर्ण शिक्षक प्रशिक्षण

शिक्षकांना व्यावसायिक प्रशिक्षण मिळावे यासाठी राज्याच्या शिक्षण विभागाकडून मान्यताप्राप्त सस्थाकडून प्रशिक्षण आणि परीक्षा घेतल्या जातात. त्यामुळे अशा प्रशिक्षण देणाऱ्या मान्यता प्राप्त खाजगी शिक्षण संस्था तसेच सरकारी शिक्षण संस्था राज्याच्या नियमानुसार चाललेल्या असतात.

सेवापूर्व शिक्षण प्रशिक्षणामध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक प्रशिक्षण संस्थांचा समावेश होतो.

- प्राथमिक शिक्षण इयत्ता 1 वी 5 वी पर्यंत आहे. या शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी किमान 10 वी 12 वीचे शिक्षण ही पात्रता आहे. अनेक राज्यात ही पात्रता 12 वी पर्यंतची अट तर काही राज्यात इयत्ता 10 ची अट आहे. प्रशिक्षण काल अनेक ठिकाणी दोन वर्षाचा तर काही ठिकाणी एक वर्षाचा आहे. शासकीय, खाजगी अनुदानित, खाजगी विनाअनुदानित संस्था आहेत. DIET मार्फत सेवापूर्ण आणि सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय केलेली आहे.

### 8.3.3 सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण

सन 1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये प्राथमिक शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाची तरतूद केलेली आहे. त्यापैकी काही कार्यक्रम पुढीलप्रमाणे :

- **शालेय शिक्षकांसाठी मूलभूत प्रशिक्षण (PMOST) :** या प्रशिक्षणाचा हेतू हा प्रामुख्याने नव्या संकल्पनाची जाणीव व्हावी सार्वत्रिक, प्राथमिक शिक्षणाचा दृष्टीकोन, कृती संशोधन, शिक्षकाच्या नव्या भूमिका जबाबदारी, ज्ञानसमृद्धी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांमध्ये आग्रह धरलेल्या गोष्टींसाठी प्रशिक्षणाची गरज असते. सन 1980 - 90 या काळात NCERT आणि SCERT यांच्या संयुक्त विद्यमाने 10 दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम राबवून 18 लाख शिक्षकांना प्रशिक्षित केले. प्रशिक्षण साहित्यात विविधराज्यांच्या छापील साहित्य देण्यात आले. राष्ट्रीय प्रसारणातून हा कार्यक्रम सर्वत्र पोहचविला प्रत्येक सत्रामध्ये चर्चा घडवून आणली. प्रशिक्षणात सहभाग आणि परस्परांमध्ये चर्चा हा दृष्टीकोन आहे.
- **प्राथमिक शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम (SOPT) :** सम 1993 - 94 या वर्षापासून प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारणासाठी कार्यक्रम राबविला, त्यामध्ये सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्याचा उद्देश होता. Operation Black Board योजना राबविली. शैक्षणिक साहित्य शिक्षकांना पुरविले. सदर कार्यक्रमात विद्यार्थी केंद्रित दृष्टीकोन ठेवून जवळपास साडेचार लाख शिक्षकांना दरवर्षी प्रशिक्षण देण्यात आले.

### 8.3.4 विशेष गरजांसाठी शिक्षक प्रशिक्षण

विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या शिक्षकांसाठी NCERT ने सर्व शिक्षकांसाठी मुख्य सेवांतर्गत प्रशिक्षणास प्राथमिक शिक्षण घेत असलेल्या विशेष गरजांसाठी वर्गामध्ये काय काय आवश्यक गोष्टी लागतात. यावर प्रकाश टाकला जातो. शिक्षकांना विविधांगी शिक्षण मिळावे हा हेतू आहे RIE नुसार NCERT चे प्रशिक्षण झालेल्या शिक्षकांना विशेष शाळामध्ये शिक्षक म्हणून संधी मिळते एकाच प्रकारचे किंवा बहुविकलांग मुलांना शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी अभ्यासक्रम तयार केलेला आहे. National Institute for Handicapped यांचे मार्गदर्शन मिळते. काही शासकीय मान्यता असलेल्या तसेच RCL Rehabilitation Council of India अभ्यासक्रमांना मान्यता देणे अनेक विद्यापीठांनी Special Education च्या महाविद्यालयाच्या B.Ed. M.Ed कोर्सेसला मान्यता दिलेली आहे.

Notes

### 8.3.5 प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम

प्राथमिक शिक्षकांनी प्रामुख्याने विद्यार्थ्यांना अक्षर ओळख अंक ओळख आणि जीवनकौशल्यांचे शिक्षण द्यावे. शिक्षकांना प्रामुख्याने मुलांची वाढ, विकास आणि अध्ययन या बाबतीत कल्पना असणे आवश्यक आहे.

प्राथमिक शिक्षण प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम हा प्रामुख्याने राज्य सरकार, तसेच राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळ तयार करते व त्यानुसार हवा तसा बदल केला जातो.

प्राथमिक शिक्षणाचा NCERT ने अभ्यासक्रम तयार केला आहे. राज्य सरकार किंवा विद्यापीठांनी त्याचा स्वीकार करून अभ्यासक्रम राबविला जातो NCRT जसा हवा तसा बदल करीत असते.

पुढील प्रकरणांमध्ये NLERT चे सूचविलेला अभ्यासक्रम दर्शविलेला आहे.

### 8.3.6 प्रशिक्षणासाठी संस्थेच्या सुविधा

सेवांतर्गत प्रशिक्षण हे केंद्र, राज्य सरकार, प्रादेशिक, जिल्हा दुय्यम जिल्हा पातळीवर होत असते. 4 प्रकरणामध्ये आपण पाहिलेले आहे.


राष्ट्रीय पातळीवर NCERT, NUEPA, इंग्रजी मध्यवर्ती संस्था, अरबी भाषा (हैद्राबाद) आणि CIL Central Institute of language Mysore) या काम पाहतात. Regional Institutes (1) Northern, (2) Western, (3) Eastern, (4) Southern असे चार विभागात काम चालते नॉर्थ इस्ट भागात शिलाँग येथे नुकतेच केंद्र उभारले आहे. राज्य पातळीवर State Institute of Education, State Institute of Science Education. ASE, CTE जिल्हा पातळीवर DIET हे सेवांतर्गत प्रशिक्षणाचे काम करीत आहे. यातील अभ्यासक्रम दुय्यम जिल्हा पातळीपर्यंत प्रशिक्षण कायम घेतले जातात. DIET मार्फत घेतलेले प्रशिक्षण प्रामुख्याने प्राथमिक शिक्षकांसाठी असते. अनेक ठिकाणी गट विभागातही सुरू केलेले आहे. सदरची प्रशिक्षण केंद्रे DPEP या नियंत्रणाखाली कार्यरत आहेत.

### 8.3.7 शिक्षक नेमणूका

शिक्षकांच्या नेमणूका करण्याच्या भिन्न भिन्न पद्धती आहेत. काही राज्यात स्पर्धा परीक्षेतून निवडलेली जाते तर काही राज्यात गुणवत्ता आणि उमेदवाराची पार्श्वभूमी विचारात घेतली जाते. शैक्षणिक गुणवत्ता आणि अनुभवाचाही विचार केला जातो. काही राज्यात शैक्षणिक गुणवत्तांबरोबर स्पर्धा परीक्षेतील गुण आणि तोंडी परीक्षा यांचा विचार करून नेमणूका केल्या जातात.

## 8. 4 राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCFTE 2009-10) आणि प्राथमिक शिक्षक प्रशिक्षणाच्या ठळक बाबी.

शिक्षक आणि शालेय शिक्षण यामध्ये समन्वय असतो. प्रत्येकाचा एकमेकावर परिणाम होतो. शिक्षकाचे प्रशिक्षण जर चांगले झाले तरच उत्तम शिक्षक तयार होतो. उत्तम शिक्षकच मुलांना चांगले अध्यापन करून शैक्षणिक दर्जा उंचावू शकतो. त्यासाठी शिक्षण प्रशिक्षण संस्था या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शिक्षणामद्ये झालेले बदल शिक्षकांमार्फत पोहचू शकतील.




**आकृती 8.3**

Notes

वरील रचना वेगवेगळ्या स्तरावर करता येईल.

**पहिला स्तर 1 :** प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण (प्राथमिक स्तर)

### 8.4.1 तर्क संगत विचार

शिक्षकांना सक्षम करण्यासाठी प्रशिक्षामार्फत आंतरदृष्टी मिळावी आणि विकास प्रक्रिया समजण्यासाठी प्रशिक्षण गरजेचे आहे. शिक्षकाचे स्थान आता अध्यापक नसून संधी देणारा facilitator अशी आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाची चौकट अधिक लवचिक झाली. NCFTE च्या धोरणानुसार स्थानिक पर्यावरणातूनच शिकण्याला खूप संधी आहे.

### 8.4.2 अभ्यासक्रमातील घटक

- उदयन्मुख भारतीय समाजाला विचारात घेवून NCFTE कडून काही गोष्टींचा आग्रह धरलेला आहे. मुलांचा शिक्षणाचा हक्क, मानवी हक्क मूल्ये आणि त्यांची विशाल दृष्टी शैक्षणिक सापेक्षता, सामाजिक आर्थिक राजकीय विकास, विविध क्षेत्रातील झालेली प्रगती त्यामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती या सर्व बदल त्या परिस्थिती शिक्षकांना जाणीव निर्माण झाली पाहिजे.
- सदरच्या अभ्यासक्रमात माणसाला अध्यापन–अध्ययन, आरोग्य शारीरिक शिक्षण, विशेष गरजांची मुले याबाबत तसेच समाज व परिसर अंतर्गत व बाह्य घटक या सर्वांचा परिणाम हा मुलांच्या शिक्षणावर होत असतो.

### 8.4.3 प्रशिक्षण

- प्रत्यक्ष थिअरी व प्रॅक्टिकल यांचा प्रशिक्षणात अर्थपूर्ण उपयोग होतो.
- अभ्यास क्रमातील शिकत असलेला भाग आणि बाह्य पर्यावरण यामध्ये सहसंबंध असला पाहिजे.
- शिक्षकांना व्यवसायात अनेक समस्या येतात. शिक्षक प्रशिक्षण घेताना कृती संशोधनाचा सराव घ्यावा म्हणजे शिक्षकांना समस्यांची जाणीव होईल व सोडविण्याचा प्रयत्न करतील.
- NCFTE च्या शिफारशीनुसार राज्ये आणखी काही भर टाकील व अभ्यासक्रम अधिक प्रमाणात सापेक्ष होईल.

### 8.4.4 अभ्यासक्रम पूर्ण करणे

अभ्यासक्रमामध्ये तीन भाग आहेत. तत्त्व, अध्यापन शास्त्र आणि प्रत्यक्ष प्रॅक्टिकल तिन्हीची विचारपूर्वक सांगड घालणे. तुम्हाला माहिती आहे ती प्रशिक्षणाचे ध्येयानुसार परिणामकारक शिक्षक बनणे हे उद्दिष्ट आहे. या तिन्हीं घटकांचे वर्णन खालीलप्रमाणे :

- **लेखी :** प्रशिक्षणामध्ये प्रामुख्याने परस्परात आंतरक्रिया, कार्य आणि उत्फूर्तपणे सहभाग हा दृष्टीकोन आहे. व्याख्यान, चर्चा, सेमिनार अध्यायनात माध्यमांचा वापर, ट्युटोरिअल, स्वयंअध्ययन, प्रॅक्टिकल्स, आशयाचे ज्ञान इ. घटकांचा प्रशिक्षणात समावेश होतो.
- **शिक्षणशास्त्र :** अध्यायन कसे करायचे म्हणजे शिक्षणशास्त्र म्हणजेच परिणामकारक अध्यापनाचे शास्त्र. आशय आणि सुयोग्य अध्यापन पद्धतीच्या समावेश होतो. शालेय विषयाचे शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने पृथ:करण करून सराव पाठ घेतला जातो. विद्यार्थी शिक्षक उद्दिष्टे समजून घेतात, वर्ग व्यवस्थापन, मूल्यमापन यासाठी अध्यापनशास्त्राचा उपयोग होतो. वैचारिक अंतरक्रियेने विषय ज्ञान उत्तम होते. अध्यापनशास्त्रानुसार पृथ:करण सुलभ होते.

Notes

- **प्रॅक्टिकल :** प्रॅक्टिकल हा भाग आवश्यक असून त्याचा उपयोग संबोध स्पष्टीकरणासाठी शिक्षणशास्त्रीय पृथक्करणाने शिक्षक उद्दिष्टे, वर्ग व्यवस्थापन, मूल्यमापन पद्धती याबाबतीत माहितगार होतो.

सामाजिक आर्थिक सांस्कृतिक उद्दिष्टाच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकात अभ्यासक्रम असला पाहिजे.

**कृती 2**

1) अभ्यासक्रम रचनेच्या तीन कल्पना सूचवा

- तात्त्वीक शिक्षण

  ----------------------------------------------------------------

  ----------------------------------------------------------------

  ----------------------------------------------------------------

- शिक्षण शास्त्र

  ----------------------------------------------------------------

  ----------------------------------------------------------------

  ----------------------------------------------------------------

- सरावपाठ

  ----------------------------------------------------------------

  ----------------------------------------------------------------

  ----------------------------------------------------------------

### 8.4.5 शिक्षक प्रशिक्षणार्थींना शिकविणाऱ्या शिक्षकांची भूमिका

शिक्षक प्रशिक्षणार्थींची अभ्यासक्रम संक्रमित करणे हे आव्हानात्मक आहे. त्यांना सातत्याने नियोजन, अनुमान, पृथःकरण, मूल्यमापन पुढाकाराने करणे हे सातत्याने काम करावे लागते. प्रशिक्षणार्थी शिक्षकांना काटेकोरपणे काम करावे लागते.

### 8.4.6 मूल्यमापन

ठरविलेली उद्दिष्ट्ये किती प्रमाणात साध्य झाली. याचा बोध घेणे म्हणजे मूल्यमापन मूल्यमापनामुळे उद्दिष्टांची परिणामकारक समजते. प्रशिक्षण काळात केलेल्या कामाची जंत्री असते. अध्यापन प्रशिक्षणामध्ये थिअरी, प्रॅक्टिस, अध्यापन आणि कार्ये यांचा समावेश होतो. मूल्यमापन हे सातत्याने सुरू असते. (CCE) मूल्यमापन म्हणजे अन्तीम टप्पानुसार प्रत्येक घटकाचे नियोजन करावे लागते. त्यामुळे internal Continuous and Comprehensive Evaluation सातत्यपूर्ण सर्वांकष मूल्यमापन हा मार्ग बाह्य परीक्षेपेक्षा चांगला आहे. लेखी मूल्यमापनाची जागा इतर प्रकारच्या मूल्यमापन पद्धती घेऊ शकतील असे CCE ला वाटत नाही.

### 8.4.7 मूल्यमापनाची साधने

उद्दिष्टांवर आधारावर अचूक मूल्यमापन होण्यासाठी सुयोग्य पद्धतीची माहिती पुढीलप्रमाणे :

- पेपर पेन्सिल चाचणी ही वस्तुनिष्ठ प्रकारच्या प्रश्नासाठी वापरतात. याबरोबरच निबंधवजा प्रश्न, लघुत्तरी प्रश्न आणि वस्तुनिष्ठ प्रश्न विचारले जातात.
- तोंडी परीक्षा
- कृतिप्रधान उदा. सरावपाठाचे अध्यापन, विविध कार्याचे मूल्यमापन हे उत्तरसूची वापरून, प्रत्येक घटकाचे गुण आणि निरीक्षणाचा कार्यक्रम राबविला जातो. अंतर्गत मूल्यमापन आहे बहिर्गत मूल्यमापन किंवा दोन्हीचे एकत्रीकरण करून गुणांऐवजी श्रेणी दिल्या जातात. यामध्ये वर्गवारी

Notes

कमी केल्याने सुलभता येणे. पण विद्यार्थ्यांच्यामध्ये हेल्दी स्पर्धेचे वातावरण रहात नाही. सामाजिक दबाव कमी होतो आणि तणावमुक्त अध्ययन होते.

**कृती 3**

आपण वरील माहिती वाचलेली आहे. त्याबद्दल वाचलेल्या भागावरून 3 प्रश्न तयार करा. प्रश्नांची सुरुवात काय, का, किती अशा शब्दांनी करा. प्रश्नांची उत्तरे 200 शब्दात लिहीता यावीत.

**काय :**

1) ------------------------------------------------------------
2) ------------------------------------------------------------
3) ------------------------------------------------------------

**का :**

1) ------------------------------------------------------------
2) ------------------------------------------------------------
3) ------------------------------------------------------------

**किती :**

1) ------------------------------------------------------------
2) ------------------------------------------------------------
3) ------------------------------------------------------------

**स्तर : प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण स्तर (इ. I ते VIII वी)**

### 8.4.8 कारणमीमांसा

सर्वांसाठी शिक्षण RTE Act. हा कायदा घटनेमध्ये समाविष्ट झालेला असून यात वय 14 पर्यंत मोफत सक्तीच्या शिक्षणाचा समावेश आहे. सदरचा वयोगट हा परिवर्तनशील आहे. अध्यापन अध्ययन प्रक्रियेत हळूवार बदल होत आहे. त्यासाठी एका टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यामध्ये जाताना विशेष पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. कारण विद्यार्थी हा परिपक्वतेकडे जाणारा आहे.

### 8.4.9 अध्ययनातील आशय

- भारतीय समाजात उदयन्मुख शिक्षणातून समाजाच्या गरजा भागविण्याची समाजमागणी आहे. प्राथमिक शिक्षण स्थिती, समस्या आणि प्रश्न या आशयाचा अभ्यासक्रम असून या प्रश्नाकडे चिकित्सक दृष्टीने पाहिले तर नक्कीच आपेक्षांची पूर्ती होवू शकते.
- अध्यापन-अध्ययनाचे मानसशास्त्र अभ्यासातून विद्यार्थ्यांना कसे शिकविणार याची रचना करता येईल.
- आरोग्यासाठी शारीरिक शिक्षणातून निरोगी राहण्याचा सराव करता येईल. यातून विशेष गरजा असणाऱ्या मुलांनाही मदत होवू शकेल.
- मुलांचे कोणत्याही प्रकारचे प्रश्न निर्माण झाल्यास शिक्षकाला त्याचे सल्लागार व मार्गदर्शक म्हणून भूमिका पार पडता येईल.

### 8.4.10 प्रशिक्षण

संभाव्य शिक्षक हा अध्यापनपूर्व अध्यायनामध्ये आणि अध्यापनानंतरच्या योग्य कृती करतो. खालील काही कृतीचा सराव आवश्यक आहे.

Notes

- समस्या निराकरणासाठी कृती संशोधन विकास
- प्राथमिक शिक्षणामध्ये विविधता आहे हे अध्यापन शास्त्रानुसार लक्षात येईल. त्यासाठी नियोजन बद्ध तयारी करावी लागेल, पाठाची तयारी करून प्रत्यक्ष पाठ घेण्यासाठी चिकित्सापूर्वक परीक्षण करावे.
- मुलांसाठी सुयोग्य अध्यापन पद्धतीचा अवलंब करा. शैक्षणिक उपक्रमातून नियोजनाची क्षमता वाढेल. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपक्रम राबविणेही आवश्यक आहे. थिअरी आणि पॅक्टिकल यांची सांगड घेतली तर प्राथमिक शिक्षक सक्षम ठरेल.

### 8.4.11 अभ्यासक्रम गतीमान करणे

**थिअरी :** अध्यापनामध्ये व्याख्यान, चर्चा, सहकार पद्धती, प्रायोगिक पद्धती अभिनय, स्वयं अध्ययन, प्रकल्प इत्यादी पद्धतींचा अवलंब केला जातो. सहल किंवा क्षेत्रभेटीस शिक्षकाला याबरोबर सहकाऱ्यांची मदत लागते. काही विद्यार्थ्यांना विशेष मदतीची गरज लागते. अभ्यासक्रमातही विद्यार्थ्यांच्या गरजा आणि स्थानिक संसाधनांच्या उपलब्धतेनुसार बदल करावा लागतो.

**अध्यापन शास्त्र :** शिक्षकाला आपल्या वर्गात शिकविण्यासाठी स्वत:ची तयारी, स्वयंशोधन, स्वयंअध्ययनाची गरज असते. सहकार अध्यापन पद्धती ही सुद्धा एकतर्फीच अध्यापन पद्धती असते. त्यामुळे तुम्ही विद्यार्थी केंद्रित अध्यापन पद्धतीचा अवलंब करू शकत नाही. त्यासाठी तुम्ही तुमच्याच विद्यार्थ्यांमध्ये सराव करा.

नियोजनच व्यवस्थित केले तर तुमच्या अध्यापनात सुधारणा होईल. अध्यापन प्रक्रियेमध्ये अध्यापनपद्धती आणि आशय यांचा मेळ घालून तुमच्या सहकाऱ्यांसोबत हा सराव केला तर त्यांच्या सूचना तसेच विषय तंत्राच्या मार्गदर्शनाने अध्यापनामध्ये सुधारणा होईल.

**सराव :** विद्यार्थी शिक्षकांना सराव होणे आवश्यक असून त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त गुणांचा वापर होईल. शाळा आणि परिसरातील घटकांमुळे उत्तम शिक्षक घडू शकेल.

शिक्षकांनी आवश्यक त्या गोष्टींची जुळणी करावी. त्यांचे नियोजन करावे व विविध उपक्रम राबवावेत, यातून तुमच्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होईल व पूरक साहित्यांचा कसा वापर करायचा याचे प्रशिक्षण मिळेल.

### 8.4.12 प्रशिक्षक शिक्षकांची भूमिका

प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी प्राकृतिक, सामाजिक, भावनात्मक आणि सौंदर्यवृद्धी सुविधांचा विकास करणे अभिप्रेत आहे. त्यांच्या सुप्तगुणांना वाव असतो. प्रत्यक्ष कृती कराल तेव्हाच या गोष्टी लक्षात येतील. त्या सतत चालू ठेवणेही आवश्यक आहे. या सर्वांचा खोलवर परिणाम मुलांवर होत असतो. सर्व सर्व गोष्टी करण्यासाठी सहकार्य, सहभाग कृतीकेंद्रित आणि संधी घेणारा शिक्षक आवश्यक तो बदल करून शिक्षण आनंददायी कसे होईल ते पहतो.

प्रशिक्षक शिक्षकांना व्यावसायिक वचन पाळण्यासाठी त्याची क्षमता दाखवून विशिष्ट परिस्थितीमध्ये सामोरे जाण्याची शिक्षकांमध्ये क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी असे पाहतो.

### 8.4.13 मूल्यमापन

या अध्यापन अध्ययन प्रक्रियेमध्ये सातत्यपूर्ण औपचारिक सर्वंकश मूल्यमापन करून सुधारणा कराव्यात अभ्यासक्रम प्रक्रियेत सुधारणा घडवून आणण्यासाठी पद्धतशीर मूल्यमापनाची गरज आहे. प्राथमिक प्रशिक्षक शिक्षक आणि प्राथमिक स्तर यांच्यामध्ये मूल्यमापनात त्याच तत्त्वांचा अवलंब केलेला असतो.

Notes

### 8.4.14 मूल्यमापन साधने

अभ्यासक्रम पूर्ततेतील यश–अपयश आपण मूल्यमापन साधने वापरून पाहू शकतो.

**कार्य – 4**

प्राथमिक शिक्षक प्रशिक्षणाचे दोन स्तरांची किमान 5 मुद्यांच्या सहाय्याने तुलना करा.

## 8.5 प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण एकात्मिक नमुन्यासह

सन 1964-66 च्या शिक्षण आयोगसाच्या शिफारशी प्रमाणे (कोठारी आयोग) गरजेप्रमाणे प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण परिणामकारक रित्या राबविणे ही गरज आहे. शिक्षक प्रशिक्षण ही अतिशय गुंतागुंतीची प्रक्रीया आहे.

प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाची रचना कशी असावी याची आकृती 3.4 वरून कल्पना येईल.

I
प्राथमिक स्तर
I to V

II
प्राथमिक शाळा स्तर
I to VIII

III
फक्त वरीष्ठ प्राथमिक स्तर
VI to VIII

**आकृती 8.4**

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण (UEE) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCFTE), शिक्षक प्रशिक्षण 2009 - 10 च्या शिफारशीनुसार प्राथमिक व मूलभूत शिक्षण याचे अभ्यासक्रम भिन्न असावेत. किंवा VI आणि VIII च्या अध्यापकांचे प्रशिक्षण भिन्न असावेत. (प्राथमिक 5.18 शाळा उच्चप्राथमिक 1.76 शाळा) (Edu - stat - Aug 2011)

### 8.5.1 प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण सध्यस्थिती

**(Diploma in Elementary Education D. El.Ed)**

प्राथमिक शाळेतील अध्यपकांच्या पात्रतेसाठी शालेय शिक्षणाची बारावी पूर्ण केलेल्यांना पात्र समजून या पदविकेला प्रवेश दिला जातो. सदर प्रशिक्षणाचा कालावधी दोन वर्षांचा असून 6 महिने आंतरवसिता internship करावी लागेल. त्या प्रशिक्षणाचा तीन भाग केलेले आहेत.

1. **थिअरी :** 9 विषय प्रथम वर्षात व 8 विषय दुसऱ्या वर्षात असून दुसऱ्या वर्षी प्रत्येक विषयाची प्रॅक्टिकल्स आहेत.
2. **प्रॅक्टिकल :** सूक्ष्मअध्यापन, सराव पाठ, समाजसेवा, संगीत, कला शारीरिक शिक्षण

**3. इंटर्नशीप :** विविध अध्यापन कौशल्ये व सुयोग्य अध्यापन पद्धतीचा अवलंब करण्यासाठी सहा महिण्याचा कालावधी असतो.

## 8.5.2 प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण सुधारणा

सर्वच मुख्य विषयामध्ये थिअरी आणि प्रॅक्टिकल एकत्र करणे. अवघड आहे मात्र दोन्हीमुळे मात्र विषय चांगला समजतो याची खात्री आहे. माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण हा अभ्यासक्रम हा विद्यापीठाच्या शिक्षण विभागाकडे जातो त्यामुळे प्राथमिक शिक्षण पूर्वप्राथमिक शिक्षक प्रशिक्षण ज्ञानाच्या दृष्टीने दुर्लक्षित राहिले.

NCF 2005 च्या धोरणानुसार प्राथमिक शाळेत काय करणाऱ्या शिक्षकांना सेवापूर्व प्रशिक्षणाची गरज आहे. त्यामुळे ते शिक्षक अभ्यासक्रम परिणामकारक रित्या राबवतील.

डी एड् (DEd) कोर्समध्ये आमूलाग्र बदल केलेला आहे. काळानुसार तसेच शाळांच्या बदलत्या भूमिका यांच्याशी मेळ घालणे आवश्यक आहे. NCF 2005, RTE 2009, मानवी हक्क आणि बालक हक्क, मूलभूत कर्तव्ये, अध्ययन सहभाग, इ. विविध नियम अधिनियम यांच्या अधिक राहून, नव्या संकल्पना राबविणे गरजेचे आहे. कौशल्य अध्ययन, सराव, व्यावसायिक दृष्टीकोन, प्रशिक्षण पद्धती शैक्षणिक साधनांचा विकास, तंत्र ज्ञानाचा वापर इत्यादी गोष्टींचा शिक्षक प्रशिक्षणामध्ये समावेश केलेला आहे. त्यामुळेच शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमात आमुलाग्र बदल केलेला आहे.

## 8.5.2 प्राथमिक अध्यापक शिक्षणात सुधारणा करणे

शिक्षण आंतरशाखीय ज्ञानावर आधारित आहे. त्याची मुळे विविध शाखांमध्ये रुजलेली आहेत. शिक्षण हे एक आचरण किंवा अभ्यास आहे. जिथे सिद्धांत आणि प्रायोगिक विवेक यांचा उगम होतो काळा नुसार अध्यापक शिक्षण संस्था विश्वविद्यालयाच्या शिक्षण विभागामधे रुपांतरीत झाली. परंतु प्राथमिक अध्यापक शिक्षण तसे प्राथमिक शिक्षण ज्ञान संबोध आणि शास्त्रीय पद्धती यापासून दूरच राहिले

राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम (एन.सी.एफ) 2005 च्या आधारे प्राथमिक विद्यालय अध्यापकांच्या सेवा पूर्व प्रशिक्षण विषयावर आणि प्राथमिक विद्यालयातील अध्यापकांचे कार्य आणि भूमिकेमधून येणे गरजेचे आहे. तसेच त्यामध्ये असे प्रशिक्षणार्थी तयार करण्याची क्षमता असावी जी प्राथमिक शाळांमधील अध्यापकांना प्रभावीपणे तयार करू शकेल.

बदलत्या काळानुसार तसेच विद्यालयातील बदलत्या पद्धतीमध्ये भूमिका आणि महत्त्वाबद्दल नवीन डी. एड. अभ्यासक्रमामध्ये अनेक प्रकारचे बदल येवू घातले आहेत हे वर्तमान प्रयत्नांनी जसे राष्ट्रीय अभ्यासक्रम 2005, शिक्षणाचा अधिकार कायदा 2009, मानवाधिकार तसेच बालकांचा अधिकार, मूलभूत कर्तव्य, बहुविध बुद्धिमत्ता, सहकार्यात्मक अध्ययन इ. संदर्भात विशेषत्वाने जोडलेले आहेत.

अशा नव्या घटकांना एकत्रित करून जे वर्तमान/तात्कालीक परिस्थितीशी जोडले जातात, त्यांना अशा अभ्यासक्रमाची आवश्यकता जाणवली की त्यात सर्व घटक एकत्रित आहेत. अध्यापक शिक्षणासंबंधी सर्व प्रक्रियेमध्ये विविध कौशल्ये शिकणे तसेच त्याचा अभ्यास, प्रशिक्षण आणि प्रॅक्टिकल आणि साधननिर्मिती विकसनाकरीता एक सलग पाठ्यक्रम तसेच एकत्रीत आणणाऱ्या घटकांची आवश्यकता आहे.

सुरुवातीला अध्यापक / शिक्षकाची भूमिका समोर ठेवून अभ्यासक्रमात विविध प्रकारचे अध्यापन साहित्य असणे आवश्यक आहे. हे विविध पाठ्यक्रम खाली दाखविले आहेत.

Notes

- I आधारभूत पाठ्यक्रम
- II विविध विषयात साधनांमध्ये समन्वय करणे
- III आधारभूत पाठ्यक्रम
- IV प्रायोगिक कार्य

**आकृती 8.5**

शिक्षणाचा संबंध विविध ज्ञानाशी आहे. वास्तविक मूळ संबंध अशा मानसशास्त्र आणि समाजशास्त्राशी आहे. शिक्षणाची विविध प्रक्रिया समजून घेण्यासाठी ह्या विषयांच्या मूलभूत अर्थ समजणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ह्या अभ्यासक्रमाचा मूळ उद्देश भावी शिक्षकांमधे अध्ययन–अध्यापन प्रक्रियां समजून घेवून प्राथमिक शिक्षकांमधे अंर्तदृष्टी विकसित करण्यास मदत करणे हा आहे.

डी. एड. अभ्यासक्रम निर्मिती मधे नवीन पहिल्यापेक्षा अधिक समर्थ, योग्य, प्रगतीशील अभ्यासक्रमाची निर्मिती झाली आहे. अशी आशा आहे की विद्यालयातील शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याकरीता हा अभ्यासक्रम उपयोगी होईल.

### 8.5.3 नवीन प्रारुपाची आवश्यकता

प्राथमिक शिक्षण हा एक मूलभूत मानवी अधिकार बनलेला आहे. त्यासाठी सुरवातीला प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व अधिक आहे. हे शक्य आहे की प्रारंभिक / सुरुवातीचे किंवा पूर्व प्राथमिक पूर्ततेनंतर बरेचशे विद्यार्थी कोणत्या ना कोणत्या कारणाने शाळा सोडतात. परंतु एक जागरूक तसेच प्रभावी नागरिकाच्या स्वरूपात राष्ट्रीय विकासामधे योगदान देणे आवश्यक आहे. तसेच प्राथमिक शिक्षणाचा व्यक्ती तसेच राष्ट्रीय विकासामधे अत्यंत महत्त्वपूर्ण सहभाग आहे. ही गोष्ट ध्यानात / लक्षात घ्यावी लागेल की एक बारावी वर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये विषयाचे प्रारंभिक ज्ञान आहे. प्राथमिक स्तर (वर्ग 3 री ते 8 वी पर्यंत) शिकविण्यायोग्य शिक्षक बनविण्याची क्षमता त्यांच्यात विकसित झालेली नसते ना ही ह्या पाठ्यक्रम / अभ्यासक्रमातील छोट्याशा काळात आवश्यक शैक्षणिक ज्ञान तो प्राप्त करू शकतो. ज्याद्वारे बालकांच्या अध्ययन प्रक्रियेला सुलभ बनवू शकतो तसेच त्यांची सामाजिक मानसशास्त्रीय तसेच शिक्षणाला आवश्यक गरजा समजू शकतो.

यापूर्वी बनविलेल्या अभ्यासक्रमात दिलेले मार्गदर्शक सिद्धांत सर्वसामान्य आणि ते प्राथमिक शिक्षकांच्या आवश्यक गरजा पूर्ण करू शकत नाहीत. अभ्यासक्रम (1998) चा विषयी एक अपवाद आहे. हा पहिला प्रयोग आहे ज्यामध्ये अवस्थेला अनुसरून सिद्धांत दिले गेले आहेत. डाएट ची स्थापना प्राथमिक शिक्षक शिक्षणाच्या मुद्यांना राष्ट्रीय स्तरावर आणण्याकरीता अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

तुम्ही आध्यापक शिक्षण गुणवत्ता अभ्यासक्रम (1998) या विषयी यापूर्वी वाचले असेलच. त्या व्यतिरिक्त ह्या मुद्यांशी संबंधित एन. सी. टी. इ. द्वारे प्राथमिक अध्यापक शिक्षण अभ्यासक्रम नूतनीकरण (2003) बाबत प्रस्ताव लेख कदाचित तुम्ही वाचला असाल. प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात विशेषत्वाने योग्यता प्राप्त अध्यापक शिक्षकांची आवश्यकता आहे. विविध अवस्थाकरीता शिक्षक शिक्षणाची सद्यस्थिती शिक्षकांकरीता पण तितकीच योग्य असेल जितकी प्राथमिक वर्गातल शिक्षकांकरीता बी. एड अनिवार्य असेल तितकेच माध्यमिक शिक्षकांकरीता एम. एड. असणे आवश्यक असेल. आजकाल प्राथमिक  शिक्षक एम. एड. करून आपली व्यावसायिक योग्यता वाढवित आहेत. प्राथमिक शिक्षकांना देखील एम. एड होता येते. वर्तमान एम. एड, प्राथमिक अध्यापक शिक्षणाची अपेक्षा आणि अटींची पूर्तता करू शकत नाही. कारण त्यांची एम. एड. ही पदवी माध्यमिक शिक्षणावर आधारीत असते.

ह्या प्रकारे आपण बघीतले आहे की प्रवेशाकरीता पात्रता आणि प्रशिक्षणाचा कालावधी वाढवून प्राथमिक अध्यापक शिक्षणाच्या विकासाची खूप आवश्यकता आहे.

### 8.5.4 नवीन संकल्पना

- **बदलल्या गरजानुरुप नवीन अभ्यासक्रम :**

  ब-याचशा शिक्षणतज्ञांचा विचार आहे की प्राथमिक अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रम पदवी कार्यक्रमाच्या तुलनेचा असावा. ह्या व्यतिरिक्त प्राथमिक शिक्षणाची मांडणी व नियंत्रण कोणत्यातरी व्यवसायिक विद्यापीठाच्या प्रमुखाकडे सोपविले गेले पाहिजे.

– जामिया मिलिया इस्लामिया ने काही काही नवीन अभ्यासक्रमाला सुरुवात केली आहे. ज्यामध्ये एक विशेष अभ्यासक्रम प्राथमिक शिक्षणासाठी एम्. एड. असा आहे.

– टी. आय. एस. एस. मुंबई ने प्राथमिक शिक्षकांसाठी एम. एड. कार्यक्रम चालू केला आहे.

- **प्राथमिक विद्यालयांमद्ये शिक्षकांकरीता एक वर्षीय बी. एड अभ्यासक्रम :**

  असा विचार केला जात आहे की एक वर्षीय बी. एड. अभ्यासक्रम चालविला जावा जो दोन वर्षीय पदविकेच्या समान असेल. ह्यामुळे प्राथमिक विद्यालयात अध्यापक प्रशिक्षणाचा दर्जा उंचावून उच्च शिक्षणाच्या स्तरापर्यंत घेवून जाण्याकरीता प्रोत्साहन मिळेल.

- **दिल्ली विश्वविद्यापीठाचा प्राथमिक शिक्षणाचा पदवी कार्यक्रम (बी. एल. एड) :**

  हा अभ्यासक्रम बारावी नंतर चालविला जातो. ज्याचा कालावधी चार वर्षाचा आहे. या अभ्यासक्रमात शिक्षण शास्त्राव्यतिरिक्त पदवी स्तरावरील अभ्यासक्रम आहे. ज्याची मान्यता मौलाना आझाद सेंटर फॉर एलिमेंटरी एंड सोशल एज्युकेशन ने दिली आहे. हा दिल्ली विद्यापीठाच्या शिक्षण विभागाचाच एक भाग आहे. हा कार्यक्रम 1994-95 मध्ये सुरू केला गेला. प्राथमिक विद्यालयातील शिक्षकांच्या गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्न ह्याद्वारे केला जातो. हा अभ्यासक्रम विषय ज्ञान, मानव विकास, शैक्षणिक ज्ञान तसेच संप्रेण कौशल्यांना एकत्रित करून तयार केला गेला आहे.

  ह्या कार्यक्रमाद्वारे प्राथमिक शिक्षणाला विद्यापीठीय व्यवस्थेमधे समाविष्ट केले गेले आहे. ज्याची सुरुवात दिल्ली विद्यापीठाने फार पूर्वी केली आहे. ह्यामुळे प्राथमिक विद्यालय शिक्षकांची व्यावसायिक प्रतिष्ठा देखील वाढली आहे. कारण की या प्राथमिक शिक्षणाकरीता विद्यापीठाची पदवी प्रदान केली जाते.

  ह्या वेळी हा कार्यक्रम दिल्ली विद्यापीठाशी संबंधीत 8 महिला माविद्यालयांमध्ये चालविला जात आहे. 1998 नंतर 3000 पेक्षा अधिक अध्यापकांना पदवी प्राप्त झालेली आहे. ह्यातील अनेक अध्यापक व्यावसायिक स्वरूपानुसार योग्य प्राथमिक विद्यालयात अध्यापक/शिक्षकांच्या भूमिकेत सरकारी आणि खाजगी विद्यालयांमध्ये काम करीत आहेत. ह्यामधे इतर शिक्षा, भाषा–विज्ञान, मानसशास्त्र विविध भाषा, इतिहास सामाजिक शास्त्र, गणित, राजनितीशास्त्र सारख्या विषयांमध्ये पदव्युत्तर अध्ययन तसेच संशोधन कार्यात व्यस्त आहे. त्यातील बहुतेक विद्यार्थी केंद्रिय विद्यापीठामध्ये शिक्षणशास्त्रामध्ये संशोधन करीत आहेत. आणि काही विद्यार्थी शिक्षक देखील बनले आहेत.

  बी. एल. एड. कार्यक्रमाचा उद्देश प्राथमिक अध्यापक शिक्षणाच्या क्षेत्रात उच्च प्रतिची योग्यता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हा आहे. विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे तसेच त्यांना सहायक तसेच प्रोत्साहित करणारे वातावरण देण्यासाठी बरेच प्रयत्न केले जात आहेत. जे विद्यार्थी बी. एल. एड. करतात. त्यांच्या समोर शैक्षणिक तसेच व्यवसायिक दोन्ही प्रस्ताव मोकळे राहतात. जे खालील प्रमाणे आहेत.

प्राथमिक विद्यालयामधे शिकविणे (वर्ग 1 आणि 7 पर्यंत) एम. सी. डी. / एन. डी. एम. सी/सर्वोदय विद्यालय (दिल्ली) केंद्रिय विद्यालय तसेच खाजगी विद्यालयांमधे

प्राथमिक विद्यालय पद्धतींमधे विविध प्रकारे नेतृत्व प्रदान करणे.

प्राथमिक शिक्षणामधे सरकारी आणि खाजगी शाळांमधे अध्यापन व संशोधन

शिक्षणशास्त्र तसेच त्या संबंधित विषयांमधे पदव्युत्तर शिक्षण तसेच संशोधन

विविध राज्य, संस्था तसेच विद्यापीठीय विभागांमधे/विद्यापीठांमधे जेथे प्राथमिक / माध्यमिक शिक्षणाबाबत प्रशिक्षण दिले जाते.

## 8.5 एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेकडे जाण्याकरीता सेतू अभ्यासक्रम

उत्तर प्रदेश सरकार एक असा कार्यक्रम चालवत आहे ज्यामध्ये असे विद्यार्थी ज्यांनी बी. एड. पास केलेले आहे आणि प्राथमिक विद्यालयात अध्यापक बनू इच्छितात. आवश्यकता वाटल्यास त्यांना 6 महिने कालावधीचा एक विशेष बी. टी. सी. कोर्स पूर्ण करू शकतात. नवीन घटकांमध्ये परिवर्तन/ बदल एक निश्चित काळात जसे की 5 वर्षामध्ये पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. ह्या सोबतच हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की अध्यापक / शिक्षक तयार करण्याकरीत वेळेची आवश्यकता आहे. तसेच वर्तमान दोन वर्षीय डी. एड. देखील चालूच राहील.

## 8.6 शिक्षक – एक चिंतनशील सत्य शोधक (विमर्शी)

शिक्षकाच्या जीवनात असे अनेक प्रसंग येतात की ज्यावेळी त्याने कल्पनाही केली नसेल अशा परिस्थितीला त्याला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत त्याने सर्वोत्तम मार्ग स्वीकारणे (निवडणे) अपेक्षित असते, परंतु हा निर्णय तो कसा घेतो? आपणसुद्धा केव्हातरी अशा द्विधा मनस्थितीत सापडला असाल ज्यावेळी योग्य निर्णय घेणे कठीण गेले असेल; त्यावेळी आपण योग्य दिशा कशी निवडाल ...... थोडावेळ विचार करा.

आत्ताच आपण सत्यशोधनाच्या चिंतनात गढून गेला होतात. अगदी बरोबर! याप्रकारे केलेल्या चिंतन, मननाने आपल्याला परिस्थितीचे उत्तम आकलन होते आणि आपण अशा योग्यतेचे बनता की ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेनुसार सर्वाधिक उत्तम उत्तम मार्गाची निवड करणे शक्य होते. अशाप्रकारे केलेल्या चिंतनशील सत्यशोधनामुळे आपण आपल्या अध्यापनाबाबत योग्य विचार करू शकतो आणि त्यातून निष्पन्न झालेल्या ज्ञानाचा उपयोग आपले पुढील अध्यापन सुधारण्यासाठी आपल्याला होऊ शकतो.

मान्य आहे की शिक्षकाला वेळोवेळी विशिष्ट निर्णय घ्यावे लागतात. परंपरागत (अध्यापना) आचरणाबाबत यावेळ काही प्रश्न निर्माण होतात. याबाबत तो सतत मनन, चिंतन करत असतो आणि त्यामुळे अध्ययन–अध्यापनाच्या प्रक्रियेत चैतन्य निर्माण होते आणि तो अधिक चांगला शिक्षक होऊ शकतो.

Notes

### 8.6.1 विमर्शी प्रक्रियेचा अर्थ

विमर्श या शब्दाच्या खालील व्याख्येमुळे आपण त्याचा अर्थ अधिक योग्य प्रकारे समजू शकतो.

- विमर्श ही एक व्यापक संज्ञा आहे. याचा उपयोग व्यक्तीच्या बौद्धिक आणि भावात्मक प्रक्रियांसाठी होतो. यात व्यक्ती आपले अनुभव तपासून पडताळून बघत असतो ज्यामुळे या अनुभवांना तो अधिक वेगळ्याप्रकारे समजू शकतो.

**विमर्शी आचरण (अभ्यास) :**

- याचा संबंध आपण जे शिकलो त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने जी कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याच्याशी येतो.
- हा बदल घडवून आणण्यासाठी विचार आणि कृती यांचा मेळ घालणे आवश्यक असते.
- यात आपले व्यवहार / कर्म याबाबत विचार करणे तसेच त्यांचे विवेचनात्मक विश्लेषण करणे याचा अंतर्भाव असतो. तसेच त्याचा उद्देश आपल्यामध्ये उत्तम बदल/सुधारणा घडवून आणणे हा असतो.

**चिंतनशील व्यावसायी :**

- एक अशी व्यक्ती असते जी आपले व्यवहार व कार्य यांचे विवेचनात्मक रितीने पुन्हा पुन्हा निरीक्षण करते, त्यांच्या परीणामांचा विचार करून भविष्यात काय व कसे करायचे याची योजना तयार करते. अशा प्रकारे आपल्या अनुभवातून सतत शिकत असते.
- ही व्यक्ती असे व्यवसाय करते ज्यामध्ये सखोल चिंतन आणि मननाची आवश्यकता असते; आपल्या व्यवसायासंदर्भात आपले अध्यापन सुधारण्यासाठी जो शिक्षक चौकशी आधारीत दृष्टीकोनाचा वापर करतो.

### 8.6.2 विमर्शी चिंतनाबाबत शिक्षणतज्ज्ञांचे म्हणणे काय आहे?

विमर्शी चिंतन करताना व्यक्ती सतत आत्मपरीक्षण आणि स्वमूल्यांकन करत असते, ज्या योगे आपल्या स्वतःच्या कृती आणि त्यांचे स्वतःवर आणि अध्ययन कर्त्यांवर होणारे परिणाम जाणून घेत असते. (ब्रुकफिल्ड 1995, थील 1999)

व्यावसायिक संशोधनाप्रमाणे विमर्शी चिंतनाचे उद्दिष्ट एखाद्या समस्येशी सबिंधित किंवा आरंभी परिभाषित केलेल्या एखाद्या प्रश्नाची उकल करणे असतेच असे नाही; परंतु व्यवहारांचे सतत निरीक्षण करणे आणि त्यात सुधारणा घडवून आणणे असे सर्वसामान्यपणे चालत राहते. (कनिंगहॅम 2001)

विमर्शी चिंतनात व्यक्तीकडून अशी अपेक्षा असते की तो स्वतःला त्रयस्थाच्या भूमिकेतून समजून घेईल आणि आपल्या व्यवहाराच्या मुळाशी असलेल्या भावना, धारणा व गृहितके यांचा शोध घेईल आणि व्यवहार त्यांचा कसा प्रभाव पडतो याचा अंदाज लावेल. (इमेल 1992)

### 8.6.3 विमर्शी प्रक्रियेची उत्पत्ती

जॉन ड्युयी हे पहिले शिक्षणतज्ज्ञ होते ज्यांनी असे सूचित केले की – शिक्षक विमर्शी चिंतनाच्या आधारे आपल्या व्यवसायात सुधारणा करू ाकतात! (ड्युयी 1933 p 118) ड्युयीने विमर्शी चिंतनाची व्याख्या खालीलप्रमाणे केली. ''कोणतीही धारणा किंवा तथाकथित ज्ञानाच्या स्वरूपाचा अशा पार्श्वभूमीवर जी त्याचे समर्थन करते आणि अशा निष्कर्षांच्या आधारावर जे त्यातून

Notes

निघतील असे वाटते अशा प्रकारे दृढतेने, सतर्कतेने व सतत केलेले चिंतन म्हणजे विमर्शी चिंतन होय!''

विमर्शी क्रियेच्या कोणत्याही घटनेत व्यक्ती एका निश्चित वर्तमान स्थितीत असते आणि त्याला अशा निर्णयावर यायचे असते जो दिलेला नसतो. अशाप्रकारे एका निश्चित स्थितीच्या आधाराने एका अशा विचारापर्यंत पोहोचायचे असते जो दिलेला नसतो. ज्याला अनुमान म्हणता येईल, ड्युयीच्या मते विमर्शी क्रिया ही अध्यापनासाठी एका समग्र उपागमाच्या रुपात असू शकते तसेच अध्यापकाला वर्गात येणाऱ्या समस्यांचे निराकारण करण्याचीही ती एक पद्धत असू शकते.

ड्युयीने विद्यार्थी प्रक्रियेचे तीन मुख्य घटक मानले.

- **खुली मानसिकता :** म्हणजे शिक्षकाची अशी क्षमता ज्यायोगे तो/ती आपल्या स्वत:च्या अध्यापनाकडे अत्यंत चिकित्सकपणे बघतो, माहितीचा शोध घेतो आणि त्यातून येणाऱ्या नवीन कल्पनांचा स्वीकार करतो व त्या आपल्या अध्यापनात अंतर्भूत करतो.
- **जबाबदारीची जाणीव :** अर्थात शिक्षकाने हे समजून घेणे आवश्यक आहे की एखाद्याच्या अध्यापनाचा विद्यार्थ्यावर काय प्रभाव पडू शकतो? शिवाय एखादा पाठ शिकताना त्याच्या शैक्षणिक उद्दिष्टांव्यतिरीक्त आणखी कोणकोणत्या गोष्टी विद्यार्थ्याला प्राप्त होऊ शकतात.
- **एकनिष्ठ :** अर्थात कोणतेही काम उत्साहाने करणे! उत्तम अध्यापनासाठी उत्साह आणि कुतूहल निर्मिती ही अनिवार्य असतात. जर आपण आपले काम पूर्ण प्रयत्न आणि आवडीने केले नाही तर आपली जेवढी क्षमता आहे तसे परिणाम येणार नाहीत. आणि आपल्या क्षमतेनुसार सर्वोत्तम कामगिरी होणार नाही.

## 8.6.4 विमर्शी चिंतन – भावनिक अनुभूती

बाउट (Boud), किओग (keogh) , वॉकर (walker) (1985) यांच्यानुसार विमर्श एक अशी क्रिया आहे ज्यात व्यक्ती आपले अनुभव पुन्हा जगतात (अनुभवतात), त्यांच्यावर विचार करतात, चिंतन करतात आणि त्यांचे मूल्यांकन करतात.

चिंतनाच्या प्रक्रियेशी भावना जोडून (संलग्नित करून) त्यांनी विमर्शाचे पैलू सांगितले आहेत.

- **अनुभवांकडे प्रत्यागमन (परतणे) :** प्रमुख घटना आत्तणे आणि त्यांची तपशीलवार प्रस्तुती करणे.
- **भावनांशी जोडणी करणे :** उपयुक्त भावनांचा वापर करणे आणि अडथळा आरणाऱ्या (अनावश्यक) भावना दूर करणे.
- **अनुभवांचे मूल्यांकन :** आपल्या अभिप्रेत / उद्देश्य आणि वर्तमान ज्ञानाच्या प्रकाशात आपल्या अनुभवांची पुर्नतपासणी / पुर्नपरीक्षण करणे आणि नवीन ज्ञानाला आपल्या संकल्पनात्मक ढाच्यामध्ये समाविष्ट करणे.

## 8.6.5 विमर्शी चिंतनशील प्रक्रियेची आधुनिक संकल्पना

Donald Schon (1983) डोनाल्ड शोन याने (knowledge in action) (हिंदीत क्रिया में ज्ञान) कार्यामध्ये ज्ञान अशाप्रकारच्या शब्दप्रयोग केला. याचा संबंध अशा ज्ञानाशी आहे जे आपण एखादे कार्य करत असताना प्रकट होते किंवा एखाद्या समस्येचे शोधन करत असताना प्रकट होते. हे ज्ञान त्या क्रियेत असते. ते आपल्या कामगिरीतून दिसते पण शब्दातून व्यक्त करता येत नाही. याप्रकारचे संदेशात्मक (tacit) ज्ञान हे संशोधनातून विमर्शी चिंतनातून आणि अनुभवातून येते. प्रत्येक विमर्शी अध्यपनाच्या अनुभवातून आपले व्यावसायिक ज्ञान वाढते आणि या ज्ञानाच्या आधारावर

अध्यापकांना कार्य करणे शक्य होते. पुढे त्याने म्हटले की कृतीवर विमर्शी चिंतन करणे ही सतत शिकण्याची प्रक्रिया आहे आणि व्यावसायिक प्रक्रियेचे ते एक वैशिष्ट्य आहे.

शोनच्या विचारानुसार विमर्शी प्रक्रियेमध्ये तीन प्रमुख पैलू समाविष्ट आहेत. कार्य चाली असताना विमर्शी चितंन करणे (Reflection in action), कार्यासंबंधी विमर्शी चिंतन करणे (Reflection an Action), कार्यासाठी विमर्शी चिंतन करणे. (Reflection for Action)

- **कार्य चालू असताना विमर्शी चिंतन करणे :** हे चिंतन कार्य चालू असताना होते. कोणतेही कार्य करत असताना त्या कार्याविषयी चिंतन करणे. (Reflection in Action) याला शोन प्रमुख कौशल्य मानतो. शिक्षकाच्या पूर्व अनुभवांना सद्यस्थितीशी जोडणे याचा उपयोग अध्ययनार्थीच्या गरजा ओळखून त्याविषयी शिक्षक अधिक जागरुक होतो. अशासाठी होतो. याचाच अर्थ असा की अध्यापन करत असताना मनन करण्याची योग्यता शिक्षकामध्ये असू शकते.
- **कार्यासंबंधी विमर्शी चिंतन :** याचा अर्थ असा की कोणत्याही अनुभवाच्या/कार्याच्यापूर्वी आणि अनुभवानंतर / कार्यानंतर त्यावर चिंतन करणे. अर्थात आपण आपल्या कार्याच्या सफलते असफलतेचे विश्लेषण याद्वारे करतो.
- **कार्यासाठी विमर्शी चिंतन :** हे अशावेळी होणे की ज्यावेळी विमर्शी चिंतनातून मिळालेले ज्ञान हे भविष्यातील कार्यावर प्रभाव टाकते. यातून असे सूचित होते की आपण आपल्या अध्यापनाविषयी स्वयंप्रेरित आहात. (Proactive)

**कृती 6**

A या घटनाशी संबंधित असणशऱ्या B घटनाशी कृती जोडा.

| A | B |
|---|---|
| कृतीमध्ये प्रतिक्रिया<br>कृतींवर प्रतिक्रिया<br>कृतींसाठी प्रतिक्रिया | अभ्यासपूर्ण आणि चिकित्सक वृत्तीने तयार करा.<br>परीक्षेचे पेपर तपासा<br>रिकाम्या जागेचा वापर करून तपासा<br>सुधारणा केलेल्या पाठाचा उपयोग संदर्भ म्हणून उपयोग करा. |

### 8.6.6 झेन्शर आणि लिस्टनची उपपत्ती

झेन्शर आणि लिस्टन (1966) चे प्रतिकृतीमध्ये 5 सूचना केलेल्या आहेत.

1. प्रत्यक्ष वर्गामध्ये द्विविधांचा वापर करून उपयोग करतो.
2. अध्यापनामध्ये प्रश्न गृहिते आणि मूल्ये आणण्याचा प्रयत्न करतो.
3. तो ज्या वर्गाचे अध्यापन करतो संस्थात्मक किंवा सांस्कृतिक दृष्टीकोनातून मदत करणे.
4. अभ्यासक्रम विकासाचा उपयोग करतो.
5. आपल्या व्यावसायिक विकासाची जबाबदारी स्वीकारतो.

झेन्शर व लिस्टनच्या परीक्षण केलेल्या मुद्यांवर प्रकाश टाकावा. प्रशिक्षणामध्ये सुधारणा सुचविल्या त्या शैक्षणिक सामाजिक, क्षमता, विकासाभिमुख, सामाजिक पुन:र्रचना स्वरूपाच्या आहेत. त्या प्रत्येकामध्ये शिक्षकांच्या विचार सरणीवर भर दिलेला आहे.

### 8.6.7 परावर्तन पद्धती

प्रत्येक घटकांच्या घटनांच्या नोंदी करण्यासाठी परिस्थिती तुमची भूमिका तुमच्या क्रियेतून मिळणारे निकाल आणि परिस्थितीवर प्रतिक्रिया खालील पद्धतीने नोंदवाव्यात.

Notes

- **कथन :** हे कथन करताना एक व्यक्ती कथन करते त्यातून व्यक्ती व व्यावसायिक विकास यांचा संबंध जोडला जाईल.
- **जर्नल्स :** आपले अनुभव व इतरांचे अनुभवातून काही शिकता येईल यासाठी आणि त्यांच्या नोंदीचा उपयोग तुम्हाला शिकण्यासाठी काय गरजेचे आहे आणि काय साध्य करणार याची नोंद घ्या.

**कृती 7**

परावर्तनीय प्रतिसाद याबद्दल 15 ते 20 ओळी लिहा.

----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------

## 8.7 सारांश

NCF 2005 मध्ये शालेय आभ्यासक्रमामध्ये प्राथमिक, उच्चप्राथमिक शिक्षणाबद्दलचे अध्ययन शास्त्र अभ्यासलेले आहे. प्राथमिक शिक्षकांचे सेवापूर्व, सेवांतर्गत शिक्षण, संस्थेची संरचना, भरती इत्यादी प्रकारची माहिती पाहिलेली आहे.

NCFTE 2009-10 यांच्या धोरणामध्ये प्राथमिक शिक्षणामध्ये I ते V आणि I ते VIII यांच्या अध्यापनामध्ये अभ्यासक्रमामधील तत्त्वे, प्रशिक्षण, अभ्यासक्रम संक्रमण, मूल्यमापन तसेच मूल्यमापणाची साधने इत्यादीची माहिती दिलेली आहे.

आपण काही प्रतिकृतीचीही चर्चा केलेली आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या आणि पदवीसाठी असलेल्या प्रतिकृतीचीही चर्चा केलेली आहे. या सर्व कल्पनामात्र शिक्षकांच्या शिवाय व्यर्थ आहे. शिक्षकांनी त्यावर विचार केला पाहिजे. तसेच यामध्ये सुधारणा होऊ शकेल. प्राथमिक शिक्षण पात्रता परीक्षा सुरू झालेल्या आहेत. (TET) बद्दल अधिक माहिती मिळेल.

**शैक्षणिक परंपरा :** शिक्षक जो अभ्यासक्रम शिकवितात ते कसे शिकवितात. आणि त्यांचे अध्यापनामध्ये विद्यार्थी कसे आत्मसात करतात त्यावर अवलंबून आहे. सामाजिक क्षमतांचा परंपरेने अध्यापन करताना कसा उपयोग करतात हे शिक्षकांवर अवलंबून आहे. विकासाभिमुख परंपराचा प्रामुख्याने भर असतो. म्हणजे विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी, त्यांचा त्यातील सहभाग विचारसरणी विकासाभिमुख आणि शैक्षणिक पातळीवर अवलंबून आहे.

**समाज पुनर्रचना :** परंपराचा परिणाम प्रामुख्याने सामाजिक व राजकीय घटकाचा परिणाम वर्गअध्यापनावर होतो. समता, न्याय व मानवी दृष्टीकोनातून शाळा आणि समाजावर कसा होतो. शिक्षकांनी काम करताना विद्यार्थी जीवनाकडे पहाणे आवश्यक आहे.

**व्यक्तिगत परंपरा :** शिक्षकाने त्यांचे काम करावे त्यामध्ये गुणवत्ता किंवा अन्यबाबी विचारात घेवू नये. शिक्षकांनी अनेक बाबी लक्षात घेवून आपले अध्यापनाचे कार्य करावे. विद्यार्थ्यांची विचारधारा आकलन आणि संशोधनाच्या आधारावर अध्यापन करावे.

**याशिवाय काही मुद्दे :**

- शिक्षकाला अंतीमध्येये, मूल्ये, मार्गदर्शन गृहीते तसेच शिकवितो. त्या परिक्षण नसेल तर उत्तम शिक्षक बनू शकत नाही.
- उद्दिष्टांवरच निष्टा नसेल, किंवा अध्यापनावरच टिका असेल तर शिक्षणावर टिका केली जाते.

- उत्तम शिक्षक सर्व मुलांना समान न्याय देतात.
- त्यामध्ये लोक शाही तत्त्वाचा अवलंब व्हावा.

## 8.8 संक्षिप्त संज्ञा

Praxis : व्यावहारिक बाजू – व्यावसायिक कौशल्य यांचा शिअरीला विरोध आहे.

## 8.9 पूरक वाचन व संदर्भ


- Approach paper for elementary teacher education curriculum renewal (2003) NCTE, New-Delhi, India.
- Biud, D. Keogh, R. Walker, D. (1985) *Reflection: Turningexperience into learning.* London: Kogan Page.
- Curriculum Framework for Quality Teacher Education (1998) NCTE,
- Dewey, J. (1933) *How We Think. A restatement of the rlation of reflective thinking to the educative process* (Revised edn.), Boston: D. C. Heath.
- Kenneth M. Zeichner and Daniel P. Liston in *Reflective Teaching: an Introduction.*
- Kothari, D. S. (Chairman) (1966) *Report of the Education Commission 1964-66.* Govt. of India, New Delhi.
- MHRD (1986) *National Policy on Education 1986.* Govt. of India, New Delhi.
- MHRD (1992) *National Policy on Education 1986: Programme of Action.* Govt. of India, New Delhi.
- National Curriculum Framework for Teacher Education (2009) NCTE, New-Delhi, India.
- Schon, DA. (1983) The reflective practitioner. Temple Smith: London
- http://indg.in/primary-education/teacherscorner/national_curriculu-for-teacher-education.pdf retrieved on10.8.2011
- http://www.indg.in/primaryeducation/policiesandschemes/rte_ssa_final_report.pdf retrieved on 8.8.2011
- http://www.ncte-india.org/pub/curr/curr.htm#26 retrieved on 12.8.2011
- http://www.ucdoer.ie/index.php/Defining_Reflective_Practice
- http://www.resources.scalingtheheights.com/Schon%20and%20Reflective%-20Practice.htm.
- http://www.infed.org/biblio/b-refect.htm


## 8.10 पाठावरील प्रश्न

NCF 2005 आणि NCETE 2009 याच्या धोरणानुसार प्राथमिक शिक्षक म्हणून तुमच्यामध्ये कोणता बदल जाणवत आहे. याबद्दल 300 शब्दात माहिती लिहा.

# घटक 9 : सुविधा वंचित विद्यार्थ्यांचे शिक्षण

Notes

**पाठ्यरचना**


9.0 प्रस्तावना

9.1 शिकण्याची उद्दिष्ट्ये

9.2 प्रवेश घेणे, कायम राखणे यासंबंधित प्रश्न

9.2.1 अनुसूचित जातीच्या मुलांचे शिक्षण

9.2.2 अनुसूचित जमातीच्या मुलांचे शिक्षण

9.2.3 विशेष गरजा असणारी मुले

9.2.4 भौगोलिकृष्ट्या दूर अंतरावर राहणाऱ्या मुलांचे शिक्षण

9.2.5 शहरातील वंचित मुले

9.2.6 बालकामगार

9.2.7 अल्पसंख्यांक मुलांचे शिक्षण

9.3 शैक्षणिक सहाय्यक व्यवस्था

9.4 सर्वसमावेशक शिक्षण

9.4.1 आंतरराष्ट्रीय मागोवा.

9.4.2 सर्व समावेशक शिक्षणाचे फायदे

9.4.3 सर्व समावेशक शिक्षणाच्या शाळा व वर्ग

9.5 शाळेमध्ये मुलांच्या हक्कांचे रक्षण

9.6 सारांश

9.7 पूरक वाचन व संदर्भ

9.8 स्वाध्याय


## 9.0 प्रस्तावना

समानता हा शालेय शिक्षणाचा महत्त्वाचा चर्चेचा मुद्दा आहे. आपल्याकडे शाळेत येणारी मुले समाजाच्या वेगवेगळ्या स्तरातून येतात. त्यामुळे त्यांच्या सामाजिक आर्थिक पार्श्वभूमिमध्ये महद अंतर असते. ज्या विद्यार्थांकडे इंटरनेट कनेक्शन आहे असे विद्यार्थी आपल्याकडे आहेत. तर ज्या विद्यार्थ्यांच्या घरी (परवडत नसल्यामुळे) रोजचे वर्तमान पत्रही येत नाही. असेही विद्यार्थी आपल्याकडे आहेत. एकीकडे विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत करणारे सुशिक्षित पालक आपल्याकडे आहेत. तर दुसरीकडे ठार अशिक्षित असणारे पालकसुद्धा आहेत. समाजातील काही जमातींनी परंपरेने शिक्षण पद्धतीचा लाभ करून घेतला आहे. तर काही जमाती या लाभापासून वंचित आहेत. या दोन्ही जमातीमध्ये असणारी दरी कमी करणे हे समाजापुढे मोठे आव्हानच आहे. या पाठ्यघटकात वर्गात सकारात्मक तारतम्य भावाने कसे वागावे? आणि वंचित घटकातून आलेल्या पहिल्याच पिढीला शालेय शिक्षणाचा लाभ कसा मिळवून देता येईल याचे समग्र विवेचन केले आहे.

## 9.1 शिकण्याची उद्दिष्टे

**हा घटक काळजीपूर्वक अभ्यासल्यानंतर तुम्ही**

- शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये असणारी प्रचंड तफावत जाणू शकाल.
- समाजातील वंचित घटकांच्या शैक्षणिक समस्यांची कल्पना करू शकाल.

- पहिल्या पिढीला शालेय विषय शिकविण्याचे कौशल्य प्राप्त  करू शकाल.
- या विद्यार्थ्यांच्या अंतरंगात प्रवेश करण्याचे आणि त्यांना शाळेतच ठेवण्यासाठी वेगवेगळ्या पद्धती शोधून काढाल
- सर्व विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक सुसंधी मिळवून देण्यासाठी आपले कौशल्य वापराल.

## 9.2 प्रवेश घेणे ते कायम राखणे

भारतीय राज्यघटनेनुसार शासनाने 6 ते 14 या वयोगटातील सर्व मुलांमुलींना मोफत आणि अनिवार्य शिक्षण देणे कायद्याने बंधनकारक आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पुष्कळ प्रयत्न करण्यात आले आहेत. प्रत्येक मुलाच्या घराजवळ शाळा असावी म्हणून संपूर्ण देशात प्राथमिक शाळांचे जाळे विणण्यात आले. खूप ठिकाणी मुलांच्या सोयीसाठी एका शिक्षकी शाळा सुरू करण्यात आल्या. मोफत वह्यापुस्तके, मधच्या वेळचे खाणे, मोफत गणवेश. वन्य जमातीमधील मुलींना रोख मदत यासारख्या योजनां राबविण्यात आल्या. विसाव्या शतकाच्या शेवटी 'जिल्हा प्राथमिक शिक्षण योजना' हा प्रकल्प भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे हाती घेण्यात आला. या प्रकल्पामार्फत ज्या जिल्ह्यामध्ये स्त्री साक्षरता दर हा सरासरी साक्षरतापेक्षा कमी होता. तेथे शाळा उघडण्यात आल्या. शाळेमधील गळतीचे प्रमाण कमी व्हावे आणि हजेरी टिकून रहावी यासाठी अथक प्रयत्न करण्यात आले. सर्व शिक्षा अभियान राबवून या प्रयत्नांना गती देण्यात आली. या दोन प्रकल्पांमुळे विद्यार्थीसंख्या वाढली आणि ती टिकून राहिली, हे मोठे फायदे झाले. तरीसुद्धा शतप्रतिशत विद्यार्थी नोंदणी आणि स्थायी हजेरी ह्या गोष्टी अजूनतरी स्वप्नवत आहेत हे स्वप्न पूर्ण करण्याचे आव्हान आपण स्वीकारावयाचे आहे आणि देशातील शिक्षक वर्गाला या बाबतीत महत्त्वपूर्ण कामगिरी बजवावयाची आहे.

### 9.2.1 अनुसूचित जातीच्या मुलांचे शिक्षण

भारतात पुरातन काळापासून चालत आलेल्या जातीव्यवस्थेमुळे समाजाचा अस्पृश्य म्हणविला जाणारा एक गट शिक्षणापासून वंचितच राहीला. सतत अंगमेहनतीची कामे करीत राहिल्यामुळे हा गट शिक्षण पद्धतीबाहेरच राहीला. स्वातंत्र्यानंतर अस्पृश्यता कायद्याने बंद करण्यात आली. या गटामध्ये असणाऱ्या जातींची एक यादी बनविण्यात आली आणि आतापर्यंत शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे या लोकांना विशेष शैक्षणिक सवलती देण्यात आल्या. अनुसूचित जातीमधील लोकांना काही घटनात्मक अधिकारसुद्धा देण्यात आले. त्यांना फक्त मोफत शिक्षणच देऊ केले नाहीतर उच्च शिक्षणासाठी त्यांच्यासाठी काही जागाही राहून ठेवण्यात आल्या. यामुळे अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांची संख्या शाळेत व महाविद्यालयातसुद्धा मोठ्या प्रमाणात वाढली. त्यापैकी बहुतेकांनी आपले उच्च शिक्षणसुद्धा पूर्ण केले. स्वातंत्र्यापासून अनुसूचित जातीचा साक्षरतेचा आलेख सतत उंचावतच आहे. तरी सुद्धा अजून ज्या समस्या आहेत त्यावर विचारविनिमय होऊन त्या समस्या दूर करण्यासाठी काही भरीव योजना आखणे आवश्यक आहे.

पूर्वीच्या काळी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना वर्गात वेगळे बसविले जात होते. वर्गात उच्च जातीतील मुलांपेक्षा अनुसूचित जातीतील मुलांना वेगळी अपमानकारक वागणूक देण्यात येत होती. उदा. वर्गात उशिरा येण्याबद्दल त्यांना झापण्यात येत होते. शिक्षण त्यांच्याकडे व त्यांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करीत असत. त्यांच्या शंकांना उत्तरे देत नसत. उलट शंका विचारल्याबद्दल त्यांच्यावर रागावत असत. सकाळच्या  सामुदायिक प्रार्थनेत त्यांना भाग घेऊ देत नसत. तसेच स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन यासारख्या सार्वजनिक कार्यक्रमात त्यांना मज्जाव असे त्यांच्याविषयी

Notes

तुच्छ भाषणे बोलणे, त्यांची अभ्यासावरून हेटाळणी करणे त्यांना शाळेतील नळावर पाणी पिण्यास मज्जाव करणे यासारखे प्रसंग घडल्याच्या बातम्या पुष्कळ ठिकाणाहून येत असत. त्या विद्यार्थ्यांना शाळा झाडणे, स्वच्छतागृहे साफ करणे यासारखी कामे करण्यास सांगत त्यांच्याबरोबर विद्यार्थीसुद्धा या विद्यार्थ्यांना खेळावयास घेत नसत. किंवा वर्गातील कोणत्याही कामात त्यांना सहभागी करून घेत नसत. त्यामुळे अनुसूचित जमातीतील विद्यार्थी आपल्या शाळेत नसलेल्या बांधवांबरोबर खेळावयास जात असत.

या सारख्या गोष्टी घडू नयेत म्हणून हस्तक्षेप करण्यासाठी प्रत्येक मागासवर्गीय विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन बारकाईने काही गोष्टींचे नियोजन करण्यात आले. शाळेत आलेल्या प्रत्येक मागासवर्गीय विद्यार्थ्याला सामावून घेण्यासाठी करण्यात आलेल्या काही सूचना पुढील प्रमाणे आहेत.

1. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर सेवक व इतर विद्यार्थ्यांनी मागासवगीय विद्यार्थ्यांशी कसे वागावे यासंबंधी काही संकेत तयार करण्यात आले.
2. मागासवर्गीय विद्यार्थ्यांला शिक्षक सेवक किंवा विद्यार्थी यापैकी कोणीही दुजाभावाने वागविल्याचे लक्षात येताच त्यावर ताबडतोब कारवाई करावी. परंतु अशी वागणूक लक्षात येणे कठीण आहे. कारण अशा पद्धतीने या लोकांशी वागणे हीच योग्य पद्धत असा समज आहे. त्यामुळे असे प्रसंग बहुतेकवेळा बहुतेकांच्या लक्षातही येत नाहीत. व त्यावर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली जात नाही.
3. अशा प्रसंगी या मुलांचे म्हणणे बारकाईने व लक्षपूर्वक ऐकूण घेणे महत्त्वाचे ठरते.
4. शाळेमध्ये दुजाभावाने वागविल्याचे प्रसंग घडल्यास त्याची नोंद घेण्याची व्यवस्था करणे, हे सुरवातीचे काम आहे. शाळेतील तक्रार पेट्यामधील तक्रारींची नियमितपणे दखल घेऊन त्याविरुद्ध शालेय स्तरावर कारवाई करणे अपेक्षित आहे.
5. वर्गातसुद्धा दुजाभाव दिसू नये म्हणून विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था जात, जमात किंवा किंग यावरून करू नये. याबाबतीत नव्वदीच्या काळात कर्नाटक राज्यात 'नली–काली' या नावाने प्रसिद्ध असलेले प्रारुप वापरावे. या प्रारुपात विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था जात, जमात किंवा लिंग यावरून करता त्यांच्या शैक्षणिक पातळीवरून करण्यात येते. यामुळे सामाजिक बंधने तोडली जातात. आणि विद्यार्थी आपल्या अध्ययन वर्तुळाबाहेर जाऊन इतर विद्यार्थ्यांशी संवाद साधू शकतील.
6. खेळ, नाटके, संगीत यासारखे सहशालेय उपक्रम राबवून व सर्व विद्यार्थ्यांना त्यात सहभाग घेण्यास सांगून विद्यार्थ्यांमधील सामाजिक बंधने तोडता येतील शाळेमध्ये या उपक्रमांकडे दुर्लक्ष केले जाते. परंतु विद्यार्थ्यांमधील साहचर्य वाढविण्यासाठी आणि त्यांच्यामधील सुप्त गुणांना उत्तेजन देण्यासाठी व जनमान्यता मिळविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे.
7. या सर्व प्रक्रियेमध्ये शिक्षक हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. परंतु आतापर्यंत या घटकाकडे दुर्लक्षच झाले आहे. यासाठी शिक्षकांमध्ये जाणीव निर्माण व्हावी. म्हणून त्यांच्या प्रशिक्षण कालावधीतच शिक्षक प्रशिक्षणात काही विशिष्ट प्रारुपे तयार करावीत. त्यासाठी खास सेवाकालीन प्रशिक्षण सत्रे आयोजित करावीत आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांबाबतीत होणाऱ्या अन्यायावरून उपाययोजना करावी.
8. माहिती अधिकारानुसार शारीरिक शिक्षा आणि खरडपट्टी या बाबतीत काही संकेत निर्माण करण्यास आले आहेत. परंतु या बाबतीत खूप काळजी व योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. शिक्षक व सेवक वर्ग यांच्या वागणुकीवरच सर्व अवलंबून आहे. शिक्षकांनी तयार केलेली अद्यापन विषयक तत्त्वे आणि वर्गातील वागणूक यामुळे मागसवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत सामाजिक तटबंदी सुटण्यास मदत होईल.

9. ज्या जिल्ह्यात मागासवर्गीय वस्ती जास्त आहे. त्या जिल्ह्यात प्राथमिक शाळांचे जाळे निर्माण करावे म्हणजे बहुसंख्य मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळेत येण्यास प्रेरणा मिळेल शिक्षण खात्याने आवश्यकतेनुसार या भागवीत शाळांची संख्या वाढवावी.

10. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणात येणाऱ्या अडथळ्यांचा विचार करण्यासाठी एक संशोधन प्रकल्प हाती घेण्याची आवश्यकता आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यावर योग्य ती उपाययोजना केल्यस त्यांच्या शिक्षणालाच मदत होते असे नव्हे तर त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यासही मदत होते.

(कुलकर्णी आणि आगरकर यांचे संशोधन 1985)

मागासवर्गीय विद्यार्थ्यांवरील बहिष्काराचे व इतर प्रश्न मुख्यत: स्थानिक पातळीवर आणि सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतात. वर ज्या दहा बाबी दिलेल्या आहेत, त्या सर्वसमावेशक आणि सर्वसाधारण स्वरूपाच्या आहेत. त्या खेरीज विशिष्ट जातीत आणि विशिष्ट परिस्थितीत येणाऱ्या समस्या वेगळ्याच आहेत. त्या ओळखून त्यांचे निराकरण करून मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिक्षणाची वाटचाल सुरळीत राहील, हे पाहणे आपले कर्तव्य आहे.

**कृती – 1**

भारतातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती घ्या व त्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1. 1950 मध्ये मागासवर्गीय लोकांची साक्षरता पातळी कोणती होती?

   ..........................................................................................................

   ..........................................................................................................

2. आत्ता साक्षरता पातळी किती आहे?

   ..........................................................................................................

   ..........................................................................................................

3. साक्षरतेच्या सर्वसाधारण प्रगतीज्ञा मागासवर्गीयांच्या शैक्षणिक प्रगतीची तुलना केली तर त्यांची प्रगती सर्वसाधारण लोकांच्या प्रगतीशी संमांतर आहे का?

   ..........................................................................................................

   ..........................................................................................................

4. मागासवर्गीयांमध्ये स्त्री आणि पुरुष यांच्या साक्षरतेच्या टक्केवारीमध्ये फरक आहे का?

   ..........................................................................................................

   ..........................................................................................................

## 9.2.2 अनुसूचित जातीच्या मुलांचे शिक्षण

अनुसूचित जमातीच्या कल्याणाबाबत देशाला वाटणारी काळजी भारतीय संविधानाच्या 46 व्या कलमामध्ये प्रतिबिंबीत झालेली आहे. या कलमानुसार अनुसूचित जमातीची शैक्षणिक आणि आर्थिक प्रगती करण्यासाठी राष्ट्र कटिबद्ध आहे. अनुसूचित जातीप्रमाणे अनुसूचित जमातींचीदेखील यादी तयार केली आहे. अनुसूचित जमातीमधील शिक्षणार्थींना शैक्षणिक बाबतीत राखीव जागा तसेच इतर फायदेही मिळतात. उच्च शिक्षणात देखील त्यांच्यासाठी राखीव जागा आहेत भारतातील काही राज्ये सोडता सर्व राज्यामध्ये अनुसूचित जमातीचे लोक विखुरलेले आहेत. अनुसूचित जमाती एकसंघ नसून त्यांचे आर्थिक सामाजिक आणि शैक्षणिक स्तरसुद्धा भिन्न भिन्न आहेत. सर्वसाधारणपणे सर्वच अनुसूचित जमाती शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या आहेत. स्वातंत्र्य

Notes

मिळाल्यानंतर या जमातींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जिल्हा शिक्षण कार्यक्रमात अनुसूचित जमातीच्या मुलांना शाळेत घालणे आणि त्याचे संपूर्ण शिक्षण करणे याबाबतीत प्रयत्नशील आहे. तरीसुद्धा अजून याबाबतीत म्हणण्यासारखे यश प्राप्त झाले नाही. म्हणून या प्रश्नाकडे बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे.

भारतातील वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातींच्या जीवनपद्धती तसेच त्यांच्या समस्यासुद्धा वेगवेगळ्या आहेत मुख्य समाज प्रवाहापासून बाजूला पडल्यामुळेच या समस्या निर्माण झाल्या आहेत. या जमाती मुख्यत: दऱ्याखोऱ्यात आणि डोंगराळ भागात राहतात. हे भाग अतिशय दूर आणि संपर्क साधण्यास अवघड असतात. ते आर्थिक दृष्ट्या दुबळे असल्याने आपल्या मुलांना रोजगाराला पाठविण्याशिवाय त्यांना पर्याय राहत नाही. या जमातीचे लोक आपल्या बोली भाषेतच व्यवहारकरीत असतात. त्यामुळे मुलांना सुद्धा त्या भागातील स्थानिक भाषा येत नाही. ज्यांच्या वस्त्यासुद्धा शाळायोग्य नसतात. अनुसूचित जमाती या भटक्या जमाती असून उदरनिर्वाहासाठी त्या सतत राज्यभर किंवा राज्याबाहेरसुद्धा भटकत असतात. त्यामुळे या जमातीतील मुलांना वर्षभर एकाच शाळेत उपस्थित राहणे अवघड होते. मुलांना शाळेकडे आकर्षित करणे आणि टिकवून ठेवणे यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे.

**त्यापैकी काही प्रयत्न पुढीलप्रमाणे –**

- अनुसूचित जमातीतील मुलांना स्थानिक भाषा समजत नसल्यामुळे प्राथमिक इयत्तेची प्राठ्यपुस्तके बोलीभाषेतच काढली जातात.
- शिक्षकांसाठी बोलीभाषा व स्थानिक भाषा यांचे शब्दकोश, तयार करण्यात आले आहेत.
- या भागातील प्रत्येक शाळेमध्ये आंगणवाडी आणि बालवाडी उघडण्यात आली आहे. त्यामुळे मुली बालकांना सांभाळण्याऐवजी शाळेत शिकण्यासाठी येऊ शकतात.
- शिक्षकांना या शाळेत शिकविता यावे म्हणून खास प्रशिक्षण दिले जाते. तसेच त्यांना बोलीभाषेचे ज्ञानही दिले जाते.
- वस्तीपासून एक किलोमीटर अंतराच्या आत शाळा सुरु करण्यात येते. किंवा शिक्षण हमी योजने अंतर्गत व्यवस्था करण्यात येते.
- शिक्षण हमी योजनेअंतर्गत असणाऱ्या व्यवस्थेचे शाळेत रुपांतर करण्यात येते.
- जी मुले तरीसुद्धा शाळेत येत नाहीत अशा मुलांसाठी वेगवेगळ्या योजनांतर्गत शिक्षणातही बीट व्यवस्था केली जाते.
- महिला समस्या सारख्या योजनेमधून अध्यापन केले जाते.
- अनुसूचित जमातीतील महिला आणि पालक यांच्या सहभागाने प्रक्रिया प्रधान सहभाग.
- अनुसूचित जमातीतील मुले आणि मुली यांच्या शिक्षणासाठी खास आर्थिक तरतूद केली जाते यामध्ये खालील गोष्टी करण्यात येतात. विद्यार्थी शाळेत घालणे व टिकवून ठेवणे त्यांच्यासाठी खास वर्गांची आणि शैक्षणिक दरी भरून काढण्यासाठी अभ्यासक्रमाची व्यवस्था करणे. पर्यायी शाळा काढणे. सध्याच्या कामगार वर्गाबरोबर काम करणे किंवा नवीन गट स्थापून काम करणे. उपस्थितीवरील लक्ष ठेवणे सुधारणा व्हावी म्हणून ते वेगळे वर्ग घेऊन शिकविणे शाळेत आणि शाळेबाहेर शैक्षणिकदृष्ट्या प्रसन्न वातावरण निर्मिती करणे.
- जमातीमधील प्रमुख लोकांना शाळा चालविण्याचे शिक्षण देणे. शैक्षणिक पर्यवेक्षणासाठी स्थानिक आणि वरिष्ठ पातळीवर केंद्र निर्मिती करणे.
- इयत्ता 8 वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मोफत निवास, भोजन व्यवस्था, शालेय गणवेश व शालेय साहित्य मोफत देणे.

- पूर्व प्राथमिक व प्राथमिक वर्गांना अद्यापन साहित्य उपलब्ध करून देणे.
- सर्व शाळांना आणि शिक्षकांना अनुदान, जमात पातळीवर पर्यवेक्षण, संशोधन संस्थाबरोबर आणि स्त्रोत संस्थांबरोबर भागीदारी आणि वारंवार घेतले जाणारे प्रत्यामरण

**आश्रम शाळांसाठी गुणवत्ता सुधार योजना –**

महाराष्ट्र शासनाच्या अनुसूचित जाती जमाती कार्यालयाने आश्रम शाळांमधील गणित आणि विज्ञान या विषयची प्रत सुधारण्याचा कार्यक्रम हाती घेतला. पूर्वी भारतात गुरुकूल. ज्या पद्धतीने चालविण्यात येत होती त्याच पद्धतीने अनुसूचित जाती जमातीच्या मुलांसाठी आश्रमशाला चालविण्यात येतात. गुणवत्ता सुधार कार्यक्रम होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रामार्फत इस 1993 -97 दरम्यान पश्चिम महाराष्ट्रातील तीन डोंगराळ जिल्ह्यात राबविला. यामध्ये पुढील तीन गोष्टींवर भर देण्यात आला.

1. विद्यार्थी क्षमता विकास 2. शिक्षक प्रशिक्षण 3. विद्यार्थ्यांमधील परस्पर सहकार्य

**1. क्षमता विकास**

क्षमता विकास करण्यासाठी शाळेमधील ग्रंथालये आणि प्रयोगशाळा विकसित करण्यावर भर देण्यात आला. विज्ञानासंबंधित पुस्तके शाळांना उपलब्ध करून देण्यात आली आणि त्यांचा प्रभावीपणे उपयोग व्हावा, अशी यंत्रणा निर्माण करण्यात आली. प्रयोगशाळेमध्येसुद्धा आवश्यक ती उपकरणे व साहित्य घेण्यात आले. त्याखेरीज गणित प्रयोगशाळा निर्मितीचा उपक्रमही राबविण्यात आला.

**2. क्षमता विकास**

तीन वर्षामध्ये गणित आणि विज्ञान शिक्षणांसाठी सहा प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. या वर्गामध्ये विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी व त्यावर मात करण्यासाठी करावयाचे उपाय यावर मार्गदर्शन केले गेली होती ती शिक्षकांना संदर्भासाठी उपलब्ध करून देण्यात आली.

**3. विद्यार्थ्यांमधील परस्पर सहकार्य**

आश्रम शाळेतील विद्यार्थी शालेय कालावधी नंतरसुद्धा परस्परांच्या सहवासातच असतात. त्यामुळे या वेळेचा सदउपयोग करण्यासाठी विद्यार्थ्यांमधील परस्पर सहकार्य वाढविण्यात आले. यासाठी काही सामुहिक कार्यक्रम घेण्यात आले. उदा. वर्तमानपत्रात आलेले लेख वाचून त्याची कात्रणे काचफलकात इतरांना वाचण्यासाठी लावणे आजूबाजूच्या वनस्पती गोळा करून एक वनस्पती संग्रहालय निर्माण करणे. या उपक्रमांमुळे त्यांचा फुरसतीचा वेळ तर कारणी लागलाच त्याचबरोबर त्यांच्या बौद्धिक क्षमतेतसुद्धा लक्षणीय वाढ झाली.

## 9.2.3 विशेष गरजा असणारी मुले

सर्व शिक्षा अभियानाचे उद्दिष्ट सर्व मुले त्यामध्ये विशेष गरजा असणारी मुले सुद्धा एकत्र आल्यासच साध्य होते. डी. पी. ई. पी. कार्यक्रमासारख्या उपक्रमामुळे काही सहाय्यक सेवा उपलब्ध झाल्यास विशेष गरजा असणारी मुले सुद्धा सर्व साधारण मुलांबरोबर शिकू शकतात. विशेष मुलांना त्यांची अक्षमता, समाज व पालक यांच्याकडून दुर्लक्ष व त्याच्या क्षमतेबद्दलची शंका यामुळे शिक्षण हक्कापासून वंचित केले जाते. तसेच समाजाची अशा मुलांबद्दल ते जे करू शकत नाहीत त्याबद्दलची सहानुभूती हा मोठा अडसर आहे. हे विद्यार्थी जे करू शकतात तिकडे समाज दुर्लक्ष करतो. विशेष गरजा असणारी मुले सामान्य मुलांबरोबर शिकली पाहिजेत हे ओळखून सर्व शिक्षाअभियानाने पुरेशा तरतूदी केल्या आहेत. विशेष गरजा असणाऱ्या मुलांना, त्याच्या अक्षमतेची पातळी लक्षात घेऊन सुद्धा उत्तम शिक्षण मिळावे हे सर्व शिक्षा अभियानाचे उद्दिष्ट आहे. म्हणून सर्व शिक्षा अभियानाचे 'शून्य अस्वीकार धोरण' अमलात आणले आहे. याचाच अर्थ विशेष गरजा असलेले कुठलेही मुल शिक्षण हक्कापासून वंचित राहणार नाही.

Notes

दिव्यांग व्यक्ती (समान संधी, हक्कसंरक्षण आणि संपूर्ण भागीदारी) कायदा 1995 कायद्यानुसार दिव्यांग व्यक्तीला त्याच्यासाठी योग्य असणाऱ्या पर्यावरणातच शिक्षण देण्यात यावे. या गोष्टीशी सर्व शिक्षा अभियानसुद्धा सहमत आहे. यामध्य स्वतंत्र वेगळ्या शाळा, पर्यायी शिक्षण व्यवस्था, किंवा घरी बसून शिक्षण या बाबींचा समावेश होतो. म्हणून वस्ती / खेडेगाव / तालुका / जिल्हा पातळीवर शिक्षण नियोजन करताना दिव्यांग व्यक्तिसुद्धा लक्षात घेतल्या पाहिजेत. दिव्यांग व्यक्तींना काही विशिष्ट गोष्टींची गरज असते. विशेष शिक्षक, विशिष्ट उपकरणे साधने हालचाल करण्यासाठी साधने इ. या विद्यार्थ्यांना आणखी काही सुविधांची गरज असते. समाजाची जागृती जाणीव ग्रामीण शिक्षण समितीची क्षमता, सेवांतर्गत प्रशिक्षण, शाळा इमारती दिव्यांग अनुकूल करणे इ.

दिव्यांग मुलांसाठी शिक्षण हक्क प्रत्यक्षात आणण्यासाठी दिव्यांग मुलांचे सर्वेक्षण त्यांच्यामध्ये असणाऱ्या त्रुटीसांठी घरोघर जाऊन करणे आवश्यक आहे. जिल्ह्यामध्ये आणि शाळा परिसरात असणाऱ्या दिव्यांग मुलांची टक्केवारी काढणे आवश्यक आहे. या मुलांसाठी जिल्ह्यामध्ये कोणकोणत्या सुविधा आहेत. यांचा आढावा घेतला पाहिजे. दिव्यांग मुलांचे त्यांच्या अक्षमतेनुसार सर्वेक्षण केले पाहिजेत या मुलांना लागणारी साधने पुरविण्यासाठी ही माहिती संबंधित राज्य सरकारच्या खात्याला दिली गेली पाहिजे. राज्य सरकार, असरकारी संघटना, तसेच दिव्यांगाना सुविधा पुरविणाऱ्या इतर संघटना (ADIP / ALIMCO /IEDC) व योजना यांच्यामार्फत दिव्यांगाना साधने पुरविली जावीत सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत यासाठी पैसा उपलब्ध करून दिला जावा.

विशेष शिक्षकांच्या नेमणूका विशेष विषय शिक्षक फिजओथेरपिस्टतर्फे उपचार, ऑक्युपेशनल थेरपिस्ट उपचार, विशेष शाळा, विशेष मूल्यमापन पद्धती, नवनवीन शैक्षणिक साधने वापरात आली पाहिजे. त्याचप्रमाणे साधने, सहाय्यकारी साधने यांचे प्रशिक्षण शिक्षकांना मोठ्या प्रमाणात देऊन त्यांना प्रशिक्षित केले पाहिजे. सामाजिक जागृती / पालकांना आवाहन या सारखे उपक्रम राबवून दिव्यांगांन्त शाळेत आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. दिव्यांगांसकट सर्व विद्यार्थ्यांना सोयीस्कर होईल असा अभ्यासक्रम तयार करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.

सामाजिक जागृती / पालकांना आवाहन या सारखे उपक्रम राबवून दिव्यांगांना शाळेत आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. दिव्यांगांसकट सर्व विद्यार्थ्यांना सोयीस्कर होईल असा अभ्यासक्रम तयार करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.

दिव्यांगाचे मूल्यमापन / परीक्षापद्धती वाबाबतीत विशेष प्रयत्न व्हावेत. उदा. दृष्टिअक्षम विद्यार्थ्यांना लेखनिक पुरविणे, अपंग, बुद्धि अक्षम विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी जादा वेळ देणे, कर्णबधीर विद्यार्थ्यांना फक्त एकच भाषा शिकण्याची सवलत देणे.

शालेय व्यवस्थापनाने समाजाच्या मदतीने शाळेच्या इमारती दिव्यांगांना वापरण्यायोग्य कराव्यात (उदा. उतार) भितींना कप्पे / शौचालयात योग्य तो बदल / वर्ग खोलीतील आवश्यक बदल) दिव्यांगांची शाळा भरती / त्यांचे शाळेतील स्थिरीकरण याबाबत पालक, अशासकीय संघटना यांनी विशेष प्रयत्न केल पाहिजेत.

### 9.2.4 भौगोलिकदृष्ट्या दूर अंतरावर राहणाऱ्या मुलांचे शिक्षण

सर्व शिक्षा अभियानात अपेक्षित ठिकाणी असणारी मुले शाळाबाह्य मुलांसाठी वैकल्पिक आणि नाविन्यपूर्ण शिक्षणक्रम तसेच अडचणीच्या ठिकाणी असणारी, भौगोलिकदृष्ट्या दूर अंतरावर राहणारी मुले यांच्यासाठी व्यवस्था करणे अपेक्षित आहे. शैक्षणिक योजनेमध्ये याबाबतीतील व्यवस्थापकीय व आर्थिक नियोजन असले पाहिजे. यासाठी सर्वांगीण योजना व लवचिक आर्थिक धोरण असले पाहिजे.

**याबाबतीत चार बाबींवर आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे.**

i) अगदी लहान वाडीवत्यांवरसुद्धा संपूर्ण वेळ भरणारी शाळा

ii) वेगवेगळ्या कालावधीचे संयोगी अभ्यासक्रम घेऊन या मुलांना शिक्षणाचा मूल प्रवाहात आणणे.

iii) बालकामगार, रस्त्यावरची मुले, कुमार अवस्थेतील मुली, मागासवर्गीय मुली, भटक्या जमातीतील मुले यासारख्या विशिष्ट गटातील मुलांच्यासाठी वेगळ्याच योजना राबविणे.

iv) नवीन उपक्रम राबविणे. हे नवीन उपक्रम अद्यापनशास्त्र, अभ्यासक्रम, कार्यक्रम व्यवस्थापन बाह्यपुस्तके आणि गृहपाठ या क्षेत्रात राबविणे

ज्या वाड्यावस्त्यांवर शाळायोग्य वयाची मुले आहेत आणि त्या परिसराच्या एक किलोमीटर अंतरात शाळा नसल्यास तेथे शिक्षण खात्री योजना राबवावी, जी मुले शाळेबाहेर पडली आहेत अशा मुलांसाठी संयोगी अभ्यासक्रम घेऊन ज्यांना मुळ प्रवाहात सामल केले जावे.

याचे उद्दिष्ट म्हणजे शिक्षण खात्री योजना व तत्सम योजना या जागतिक प्रात्यक्षिक शिक्षण योजनेचाच एक भाग असणे होय शिक्षण खाली योजनेसाठी CRC / BRC / DIET / SCERT यांची गरज असते.

शाळाबाह्य मुलांमध्ये हे खूपच विविधता आहे. ही मुले ज्या भागात शाळाच नाही, त्या भागात राहणारी असतात किंवा काम करणारी असतात, झोपडपट्टीतीलच रस्त्यावर फिरणारी असतात. शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांची असतात. ज्या मुली अल्पसंख्यांक समाजाच्या असतात. त्याही शाळेत जात नाहीत. घरकाम करणाऱ्या मुली किंवा मुले सांभाळणाऱ्या मुली, गुरे राखणारी मुले देखील शाळेत जाऊ शकत नाही. इतकी विविधता असलेली मुले शाळेत आणावयाची असतील तर वेगवेगळे मार्ग आणि योजनांची गरज आहे. शिक्षण हमी योजना किंवा वैकल्पिक एकात्मिकरण शिक्षण यामध्ये ज्या दूरस्थ भागात एक किलो मीटरच्या परिसरात शाळा नाही आणि शाळायोग्य वयाची 15 मुले आहेत. (10 मुले पर्वतीय भागात व ती शाळेत जात नाहीत.) अशा ठिकाणी शिक्षण हमी योजना किंवा वैकल्पिक एकात्मिकरण शिक्षण योजनेअंतर्गत शिक्षण केंद्र चालू करता येते. शाळेत न जाणाऱ्या मुलांसाठी वैकल्पिक एकात्मिकरण शिक्षण योजनेअंतर्गत विविध प्रकारचे आणि कालावधीचे सेतू पाठ्यक्रम तयार करण्यात यावेत. काम करणारी मुले, रस्त्यावरची मुले, पौगंडावस्थेतील मुली, काही मागासवर्गीय जमातीतील मुली, भटक्या जमातीतील मुले या  शाळेत न येणाऱ्या गटासाठी विशेष नाविन्यपूर्ण योजना आखण्यात याव्यात.

## 9.2.5 शहरातील सुविधा वंचित मुले

शहरातील शिक्षणापासून वंचित राहीलेल्या मुलांकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. शहरातील गरीब लोकसंख्येतील शालाबाह्य मुलांचे प्रमाण वाढत आहे, हे नुकत्याच केलेल्या पाहणीत आढळून आले आहे. शहरातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलापर्यंत त्यांच्यासाठी केलेल्या शैक्षणिक तरतूदी शाळा व्यवस्थापनातील गलथानपणामुळे पोहोचू शकत नाहीत. काही बिनसरकारी संस्थांनी या बाबतीत उल्लेखनीय काम केले आहे. उदा. 'प्रथम' या संस्थेने मुंबई महानगरपालिकेच्या समवेत केलेले भरीव काम किंवा सिटी लेव्हल प्लॅन या संस्थेने कलकत्यात केलेले काम. प्राथमिक शिक्षण योजना तयार करताना महानगरपालिका क्षेत्र 'जिल्हा' म्हणून समजले जाते. या प्रस्तावात विकेंद्रित व्यवस्थापन पद्धती वापरली जाते. हे प्रस्ताव मनहानगरपालिकेमार्फत तयार केले जातात आणि सर्व शिक्षण अभियानाअंतर्गत राज्य शासनाकडून आर्थिक तरतूद केली जाते. सर्व शिक्षण अभियानाच्या सर्व अटी नागरी क्षेत्रालासुद्धा लागू आहेत. या ठिकाणी एखादी झोपडपट्टी हे सुद्धा प्राथमिक शिक्षण प्रक्रियेचे एकक होऊ शकते. शहरी भागातील या बाबतीतील समस्या वेगळ्या आहेत. उदा. रस्त्यावरील मुले, रस्त्यावरील रद्दी, कपडे, डबे गोळा करणारी मुले, ज्या मुलांचे पालक अशा व्यवसायात गुंतलेले आहेत की त्याच्या मुलांना शिक्षण घेणे अशक्य व्हावे,

कारखान्यात काम करणारी मुले, घरकाम करणारी मुले, उपहारगृहात काम करणारी मुले शहरी भागातील समस्यांबाबत विविध मार्गाने या प्रश्नांचा उलगडा करणे आवश्यक आहे. शहरी भागातील शालेय प्रशासन आणि संबंधित प्रशासकीय खाती व स्थानिक महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग यांच्यामध्ये संमजस्य झाल्यासच या मधून योग्य तो मार्ग निघेल यासाठी शहरी भागासाठी वेगळी योजना किंवा लहान शहर असल्यास जिल्हा योजनेत वेगळी योजना आखणे आवश्यक आहे. या सर्व ठिकाणी महानगरपालिका प्रशासन, प्राथमिक शिक्षण विभाग बिनसरकारी संस्था यांच्यात सहकार्य आवश्यक आहे.

शहरामधील कमी उत्पन्न गटाच्या वस्त्यांमधून (झोपडपट्टी) राहणारी मुले शिक्षणापासून वंचित असतात. यांना आपण 'शहरी गरीब' असे संबोधूया. ही मुले आर्थिकदृष्ट्या गरीब असतात असे नव्हे तर त्यांना घरूनही शिक्षणासाठी पाठिंबा मिळत नाही आणि शिक्षणासाठी मार्गही मिळत नाही. ही मुले शालाबाह्यच राहतात. आणि त्यांना शाळेत आणणे हे मोठे आव्हानात्मक कार्य ठरते.

असंख्य प्रशासकीय विभाग, सूक्ष्म नियोजनाची आणि सहकारात्मक अंमलबजावणीची उणीव, संमिश्र जमाती, सुविधा नसलेल्या शासकीय शाळा, वर्गामध्ये अद्यापनात होणारी हेळसांड, निकृष्ट दर्जाचे अद्यापन, नियोजनाचा अभाव, शाळेच गैरसोयीची जागा गैरसोयीची वेळ त्यावर व्यर्थ होणारा खर्च, शालाबाह्य मुलांची शासनाजवळ असणारी अपुरी माहिती, नवीन शाळा उघडण्यासाठी जागेचा अभाव यासारखे काही घटक शहरी वस्तीतील शालाबाह्य मुलांना शाळेत आणण्यासाठी प्रतिबंधक ठरतात.

गरीब आणि वंचित मुलांना शिक्षणासाठी येणाऱ्या समस्या असंख्य आणि गुंतागुंतीच्या आहेत. त्यामध्ये या मुलांच्या बाबतीत असणारी अपुरी माहिती अपुऱ्या शाळा, शाळेत येण्यासाठी मुलांना अद्युक्त करणारी कोणतीही योजना नसणे, शाळेची गैरसोयीची जागा इ. आहेत. तरीसुद्धा काही बिनसरकारी संस्था यासाठी काम करत आहेत. परंतु त्या सर्व मुलांपर्यंत पोहोचू शकत नाहीत. आणि बहुसंख्य मुले त्यांच्या आवाक्याबाहेर आहेत. यामधील बहुसंख्य मुले भटक्या जमातीतील आहेत. नागरी प्रशासन या मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्याचा प्रयत्नात कमी पडत आहे.

नागरी गरीब मुले साधारणपणे खालील प्रकारात मोडतात.

1. झोपडपट्टी आणि पुनर्वसाहतीत राहणारी मुले.
2. काम करणारी मुले / मजूर घरकाम करणारी मुले.
3. रस्त्यावरील मुले
4. शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांची मुले.
5. भटक्या जमातीमधील मुले.
6. रिमांड होम जुनेनाईल होम येथील मुले
7. भीक मागणारी मुले
8. अपंग पालकांची मुले.

वरीलपैकी प्रत्येक गटातील मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी दीर्घकाळ प्रयत्न करावे लागतील तसेच प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष द्यावे लागेल. या मुलांसाठी योजना तयार करताना. योजनेमध्ये बरीच लवचिकता असणे आवश्यक आहे. सर्व शिक्षण अभियानात नेहेमीच्या शाळेखेरीज या मुलांना शिक्षण हमी योजना, वैकल्पिक एकात्मिकरण योजना यासारख्या योजनांचा लाभ मिळवून देण्यात येतो. शासनाचे प्रयत्न याबाबतीत अपुरे पडत असल्यामुळे बिगरशासकीय संस्थांची या कामी अतिशय चांगली मदत होते. शाळाबाह्य मुलांना शिक्षण देण्यासाठी सेतु अभ्यासक्रम, उपचारात्मक अभ्यासक्रम, राष्ट्रीय मुक्त विद्यालय, 'परत शाळेकडे कॅम्पस्' यासारखे उपक्रम राबवावेत.

### 9.2.6 बालकामगीर

बाल कामगार हा आपल्याकडे कायद्याने बंदी असणारी गोष्ट आहे. बालकामगारांना नेमणाऱ्यास कायद्याने शिक्षा होते. तरीसुद्धा दारिद्र्यामुळे बऱ्याच मुलांना कौटुंबिक उत्पन्नासाठी काम करावे लागते. ही मुले शालेय वेळेत कामावर असल्याने शाळेत जाऊ शकत नाहीत. त्यासाठी त्यांना कामावरून काढून शाळेत घालणे हाच उपाय होऊ शकतो त्यासाठी या मुलांच्या पालकांना आर्थिक भरपाई द्यावी लागेल. हे करणे अशक्य आहे. त्या ऐवजी या मुलांना रात्रीच्या शाळेत घालणे हा सुवर्णमध्य होऊ शकेल.

सध्या नागरी विभागात बऱ्याच रात्र प्रशाला आहेत. शहरी विभागात तर रात्र प्रशालांची संख्या पुष्कळ असून त्यांची विद्यार्थीसंख्यापण खूप आहे. या शाळेची. मुख्य समस्या म्हणजे दिनप्रशालेचाच अभ्यासक्रम यांना नाईलाजास्तव शिकवावा लागतो. अद्यापनासाठी शिक्षण आणि विद्यार्थी यांच्याकडे अगदी कमी वेळ असतो. शाळेत येणारे विद्यार्थी दिवसभर काम करून दमून आलेले असतात. त्यामुळे या शाळांसाठी वेगळा अभ्यासक्रम आखणे गरजेचे आहे. हे विद्यार्थी दिनप्रशालेच्या विद्यार्थ्यांपेक्षा वयाने मोठे असतात. आणि त्यांना कामाचा अनुभवदेखील असतो, म्हणून त्यांना वेगळ्या पद्धतीने शिकविले तरी चालेल या मुलांना काही अभ्यासक्रम नेमून द्यावे, हे अभ्यासकाम ते आपल्या फावल्या वेळात करतील. या विद्यार्थ्यांवर नियमित विद्यार्थी जो अभ्यास करतात, त्या अभ्यासाची सक्ती करण्याची गरज नाही. उलट अभ्यासक्रमाची आखणी अशा पद्धतीने करावी की त्या अभ्यासक्रमातून ते आपली दैनंदिन कौशल्ये शिकतील आणि त्या कौशल्यांचा त्यांना दैनंदिन कामातच उपयोग होईल. नेहमीच्या विद्यार्थ्यंच्या घटना आणि तत्वे यांच्या औपचारिक अभ्यासापेक्षा व्यवसायावर आधारित अभ्यासक्रम त्यांना उपयोगी पडेल हा अभ्यासक्रम त्यांची कौशल्ये वाढविण्यासाठी उपयोगी पडेलच त्याचबरोबर त्यांच्या उत्पन्नात सुद्धा वाढ होण्यास कारणीभूत ठरेल.

### 9.2.7 अल्पसंख्यांक मुलांचे शिक्षण

समाजातल बहुसंख्यांक वर्गामधून येणाऱ्या मुलांच्या गरजांची पूर्ती करण्यासाठी अभ्यासक्रमाची आखणी करण्यात आलेली असते. त्यामुळे अल्पसंख्यांक समाजातून आलेल्या मुलांची वर्गात कुचंबना होते. या मागची काही कारणे.

1. पाठ्यपुस्तकातील भाषा आणि वर्गातील शिक्षण माध्यमाची भाषा ही या विद्यार्थ्यंच्या मातृभाषपेक्षा वेगळी असते.
2. पाठ्यपुस्तकातील अनुभव व वर्गातील विवरण या गोष्टींशी हे विद्यार्थी परिचित नसतात.
3. सांस्कृतिक पार्श्वभूमी वेगळी असल्याने बहुसंख्यांक विद्यार्थ्यांच्या भावनांशी ते सहमत होऊ शकत नाहीत.
4. या विद्यार्थ्यांना वर्गात शिकविला जाणारा भाग अप्रस्तुत वाटतो.

## 9.3 शैक्षणिक सहायता व्यवस्था

शालेय शिक्षणामधील शिक्षकांचे सक्षमीकरण हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कार्यरत शिक्षकांना अनेक मार्गांनी सक्षम करता येते. वेतनात वाढ, शालेय सुविधांमध्ये वाढ वर्गात शिकविण्याचे स्वातंत्र्य यावे सक्षमीकरणाच्या काही बाबी आहेत. शैक्षणिक बाबींमध्ये शिक्षकाकडून असंख्य बाबींची पूर्तता अपेक्षित आहे.

काही देशामध्ये 'शिक्षक सहाय्यता सेवा' ही प्रणाली शिक्षकांना मदत करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. शिक्षकाचा दररोजच्या अद्यापनामध्ये ज्या अडचणी येतात त्या सोडविण्यासाठी शिक्षकाने या सेवेशी संपर्क साधणे अपेक्षित आहे ही सेवा मोफत आणि तात्काळ आहे. आपल्याकडे

Notes

अशाप्रकारे प्रकारची सेवा उपल्बध नाही. परंतु आपण जिल्हा पातळीवर जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था (DIET) आणि त्या खालील स्तरावर ब्लॉक स्त्रोत केंद्रे (BRC) व पुंज स्त्रोत केंद्रे (CRC) काढली आहेत. या संस्थामार्फत शिक्षकांना मार्गदर्शन केले जाते. कार्यरत शिक्षकाने या संस्थांशी संपर्क साधून साधन व्यक्तींची मदत घ्यावी.

तंत्रज्ञानात झालेल्या विकासामुळे आपल्या आयुष्यात आमूलाग्र बदल झाला आहे. तंत्रज्ञानामुळे अन्नधान्य उत्पादनात वाढ, रोगनियंत्रण, मालाची सुलभतेने ने आण आणि तत्काळ संपर्क शक्य झाला आहे. शाळा ही समाजाचा घटक असल्यामुळे यापासून अलग राहू शकत नाही. त्यामुळे ओव्हरहेड प्रोजेक्टरसारखी उपकरणे आपण वर्गात वापरत असतो. सध्या तर LCD प्रोजेक्टरसुद्धा वर्गातून वापरला जातो. या प्रोजेक्टरचा संगणकाबरोबर उपयोग केल्यास शिक्षकाला वर्गात त्याचा विषय अत्यंत प्रभावीपणे शिकविता येईल.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) ही आपल्याला शैक्षणिक उपक्रमात मदत करते. ऑक्टोबर 2004 मध्ये या संस्थेने EDUSAT हा उपग्रह अंतराळात पाठविला. हा उपग्रह भूस्थिर असल्याने सर्व शैक्षणिक कार्यक्रमांसाठी सर्वकाळ उपलब्ध असतो या उपग्रहाद्वारे तज्ञ व शिक्षक परस्परांशी विचार विनिमय करू शकतात. तसेच व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारा शिक्षक सुद्धा आपले विचार कल्पना आणि अनुभव यांची देवाण घेवाण करू शकतात. वेगवेगळ्या जिल्ह्यात प्रांतात कार्यरत असलेल्या आपल्या सहकाऱ्यांकडून सल्ला घेऊ शकतात.

माहिती तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे जग आणखी जवळ आलो आहे. माहिती जालाचा वापर करून जगातील कोणतेही व्यावसायिक जलदगतीने परस्परांशी संपर्क साधू शकतात. एखाद्या डोंगराळ भागात असलेला शिक्षक सुद्धा जगातील आपल्या कुठल्याही सहकाऱ्याशी संपर्क साधू शकतो. तसेच आता त्याला लागणारी सर्व माहिती जणू त्याच्या हाताच्या बोटावरच आहे. 'खुला शैक्षणिक स्त्रोत' (OER) हा सर्वांना मोफत वापरण्यासाठी उपलब्ध आहे. याचा उपयोग कोणत्याही शैक्षणिक स्तरावर कार्यरत असलेल्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना होतो. यामध्ये जी माहिती आहे. ती माहिती आपण मोफत डाऊनलोड करून आपल्या वर्गातील अद्यापनासाठी वापरू शकतो. भारतात माहिती जालाचा प्रसार अत्यंत वेगाने होत आहे. त्यामुळे एखाद्या खेड्यातील शिक्षक OER मार्फत आपल्या वर्गात एखाद्या विषय प्रभावीपणे शिकविल, असा दिवस दूर नाही.

**खुला शैक्षणिक स्त्रोत (OER) शाळेसाठी प्रकल्प :**

होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र (HBCSE) टाटा भौतिक संशोधन संस्था (TIFR) चे विज्ञान आणि गणित याचे संशोधन केंद्र आहे. (http//www.hbcse.tifr.res.in) या केंद्राने मोफत ज्ञान स्त्रोत विकसित करण्याचे ठरविले आहे. (www.gnowledge.org) त्याचाच भाग म्हणून शाळेसाठी OER तवयार करण्यात येत आहे. याचा वापर करून अगती दूरवर असणाऱ्या खेडेगावातील शिक्षक प्रभावी अद्यापन करू शकणार आहे. या प्रकल्पासाठी लागणारा पैसा महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाकडून पुरविण्यात येणार आहे. हा प्रकल्प HBCSE, MKCL, (Maharastra knowledge Corporation Limited) आणि (Indian Consortium for Educational Transformation (I-CONSENT) यांच्या परस्पर सहकार्याने राबविला जाणार आहे. या प्रकल्पाचा उद्देश्य शालेय गणित आणि विज्ञान या विषयातील विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्याच्या मदतीसाठी माहिती तयार करणे हा आहे. ही माहिती महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड (MKCL) मार्फत संबंधितांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही माहिती त्यांना विनासायास मिळते.

शालेय शिक्षणाचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक हे तीन महत्त्वाचे घटक आहेत महाराष्ट्रातील मुलांच्या गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून हे सर्व साहित्य मराठीत तयार करण्यात आले आहे. हे साहित्य तयार करण्यासाठी संसाधन व्यक्ती, अनुभवी शिक्षक, अनुभवी पालक, विषय तज्ञ आणि

शिक्षणशास्त्रात संशोधन करणारे संशोधक यांची मदत झाली आहे. हे सर्व साहित्य MKCL ते विकसित केलेल्या माहितीजालावर टाकण्यात आले आहे. कोणत्याही व्यक्तीला हे सर्व साहित्य फुकट डाऊलकोंड करण्यास परवानगी आहे.

शाळासंबंधित OER इतर भाषेत सुद्धा करण्याचे ठरले आहे. त्यासाठी field testing म्हणजे क्षेत्र चाची चालू आहे. यंत्रणेत योग्य ते बदल करून झालेल्या कार्यक्रमांचा प्रत्याभरण अहवाल पाहून हा प्रकल्प पूर्णत्वास न्यावयाचा आहे.

## 9.4 सर्वसमावेशक शिक्षण

### 9.4.1 आंतरराष्ट्रीय मागोवा

सर्वसमावेशक शिक्षण या संकल्पनेला गेल्या काही वर्षात अत्यंत महत्त्व आले आहे. या संकल्पनेचे मूळ शोधण्यासाठी आपणास आंतरराष्ट्रीय शिक्षणशास्त्राचा इतिहास पहिला पाहिजे. आज ही संकल्पना आंतरराष्ट्रीय संकल्पना झाली असली ती तिचे मूळ प्रगत आणि संपन्न राष्ट्रामध्ये आढळून येते. या देशांनी त्यांच्या देशात दिव्यांगाना असलेल्या शाळा बंद करून त्यांना नेहमीच्या शाळेत आणून बसविले. हा बदल एका फार मोठ्या चळवळीचा भाग होता. या चळवळीमध्ये दिव्यांगाची अक्षमता हा अडथळा समजला जात नसे त्यामुळे दिव्यांगाना मूळ समाजापासून बाजूला काढण्याची गरज उरली नाही. त्याचाच परिणाम म्हणून एकात्मिक शिक्षण युग सुरू झाले. आणि सर्वसाधारण वर्गात सर्वसमावेशक शिक्षण सुरू झाले.

शिक्षण हा मुलाचा मुलभूत हक्क आहे. हे अनेक आंतरराष्ट्रीय जाहीरनाम्यात नमूद केले आहे. या बाबतीतील पहिली आंतरराष्ट्रीय पातळीवरील घोषणा यूनोच्या चार्टर ऑफ युनायटेड नेशन्स (1942) मध्ये करण्यात आली. युनिव्हर्सल ड्रिवलेरेशन ऑफ ह्युमन राईट्स (1948) ने सुद्धा शिक्षणाचा मूलभूत हक्क मान्य केला आहे. याचा यूनोने 1959 मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'युनायटेड नेशन्स डिक्केरेशन ऑफ राईटस ऑफ चाईल्ड' मध्ये बळकटी दिली आहे. या जाहिरनाम्या मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी त्याच्या पालकांवर टाकण्यात आली आहे. नंतर 1960 मध्ये यूनोच्या घटनेत सर्वांना समान शिक्षण हा संबोध स्पष्ट करण्यात आला 1992 मध्ये यूनोने मुलांचे हक्का संबंधी केलेल्या मसुद्यावर 107 देशांनी सही करून सर्वांसाठी शिक्षण मान्य केले आहे. मुलांचा शिक्षणाचा मूलभूत हक्क मान्य करून शिक्षणात सर्वांना समान संधी मिळविण्याविषयी प्रतिपादन केले आहे. आणि मुलाची व्यक्तिमत्व, हुशारी मानसिक आणि शारीरिक क्षमता यांचा विकास त्याचा महत्तम क्षमतेपर्यंत व्हावा अशी अपेक्षा केली आहे. याच पावलावर पाऊल ठेवून भारत सरकारने शिक्षणविषयक हक्काचा कायदा (RTE) लोकसभेत मंजूर केला.

याबाबतीतील मार्गदर्शक तत्वानुसार शाळेने विद्यार्थ्याला प्रवेश देताना त्यांच्या शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, भावनिक भाषिक किंवा इतर क्षमतांचा विचार न करता प्रवेश द्यावा. प्रवेश देताना अक्षम, दिव्यांग, रस्त्यावरील मुले, बालकामगार, डोंगरदऱ्यातील मुले, भटक्या समातील मुले इतर भाषिक, भिन्न जाती, सांस्कृतिक दृष्ट्या अल्पसंख्यांक, अप्रगतशील भागातील विद्यार्थी या सर्वांना प्रवेश द्यावा. या प्रतिपादनावरून असे लक्षात येते की विद्यार्थ्यांचा सर्व प्रकारांना एकत्र प्रवेश द्यावा. सर्वसमावेशक शिक्षणामुळे आपल्याला अनेक समस्यावर मात करता येईल.

### 9.4.2 सर्वसमावेशक शिक्षणाचे फायदे

प्रगतशील देशापेक्षा प्रगती पथावरील देशांमध्ये सर्कसमावेशक शिक्षणाला जास्त महत्त्व आहे. खालील बाबतीत सवसमावेशक शिक्षणाचा फायदा होऊ शकेल.

**साधनसंपत्तीचा परिणामकारक वापर –**

शिक्षण ही एक जोखमीची साधनसंपत्ती असून तिला देशाच्या इतर अनेक मागण्यांबरोबर (उदा. आरोग्यसेवा) स्पर्धा करावी लागते. त्यामुळे प्रगतीशीच देशांमध्ये शिक्षणाला साधन संपत्तीची नेहमीच कमतरचा भासते वेगवेगळ्या क्षमतेच्या मुलांसाठी वेगवेगळ्या शाळा काढणे हे या देशांना शक्य होत नाही. त्यासाठी आपल्याकडे असलेली मर्यादित साधसंपत्ती सर्व विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी वापरावी, हा सर्वमान्य उपाय आहे. याने साधनसंपत्तीचा प्रभावीपणे वापर केला जातो.

**आर्थिकदृष्ट्या परवडण्याजोगे शिक्षण –**

सर्वसमावेक शिक्षण आर्थिकदृष्ट्या केवळ कार्यक्षमच नाही तर फायदेशीरसुद्धा आहे. सर्वसमावेशक शिक्षणामध्ये फक्त दिव्यांगांचाच स्तर उंचावतो असे नाही तर त्याचा फायदा इतरांनाही मिळतो. अशा तऱ्हेने वेगवेगळ्या विद्यार्थ्यांमध्ये असणारी विविधता लक्षात घेऊन सर्वांसाठी उच्च पातळीचे शिक्षण मिळते. याबरोबर सर्व समावेशक शिक्षणामध्ये समाजातीलर स्तर लक्षात घेतले जात. नाहीत व त्यामुळे समाजातील वेगवेगळ्या गटांमध्ये एकोपा राहण्यास मदत होते.

**विकेंद्रीकरण –**

सर्वसमावेशक शिक्षण विकेंद्रीकरणास चालना देते. विकेंद्रीकरणामुळे शिक्षण व्यवस्थापनाचा वरच्या केंद्र आणि राज्यशासनाच्या खर्चात कपात होते. त्याचबरोबर स्थानिक लोकांच्या गरजा लक्षात घेऊन स्थानिक पातळीवरच निर्णय घेतला जातो. या परिस्थितीत निर्णय घेताना स्थानिक लोकांना आपले म्हणणे मांडता येते. व त्याप्रमाणे आपल्यासारखा निर्णय करून घेता येतो. थोडक्यात केंद्रीत निर्णय घेणाऱ्या नोकरशाहीच्या ऐवजी ग्राहक मार्गदर्शित योजना सर्वसमावेशक शिक्षणामध्ये राबविली जाते.

## 9.4.3 सर्वसमावेशक शिक्षणाच्या शाळा व वर्ग

सर्वसमावेशक शिक्षणाच्या शाळा व वर्ग समाजातील प्रत्येक घटकाचा आपल्या क्षमतेनुसार शिक्षण घेण्याची संधी मिळवून देण्यासाठी सर्वसमावेशक शाळांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे शाळेचे मुख्य उद्दीष्ट शिक्षण घेणाऱ्यांमध्ये असणाऱ्या विविधतेला महत्त्व देऊन प्रत्येकाच्या हक्काचे रक्षण होईल अशी व्यवस्था करणे हे आहे. सर्वांना प्रवेश हा सर्वसमावेशक शिक्षणाचा मुख्य संबोध आहे यामध्ये शाळेच्या मानसिक आणि भौतिक पर्यावरणाबरोबरच अभ्यासक्रम देवाणघेवाणीचाही सामवेश होतो. वेगवेगळ्या सामाजिक परिस्थितीतून आलेल्या आणि वेगवेगळी क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेची सर्व परिस्थिती माहिती असणे आवश्यक असते. थोडक्यात शाळेमध्ये असणाऱ्या सर्वसमावेशक शिक्षणामुळे सर्व विद्यार्थ्यांची व्यक्तिगत शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगती होण्यास मदत होईल.

सर्वसमावेशक शिक्षणाचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक आणि या शिक्षकाचा वर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन होय. बुद्धिमत्ता परंपरागत असते आणि त्याच्यात आपण सुधारणा करू शकत नाही. हा शिक्षकाचा दृष्टिकोण असल्यास तो विद्यार्थ्यांना प्रगतीसाठी कधीच उत्तेजन देऊ शकणार नाही. याउलट जो शिक्षक व्यक्तीच्या क्षमतेबाबत आशावादी असतो आणि बुद्धिमत्ता विविधांगी असणे असे मानतो अशा शिक्षक सर्वसमावेशक शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गुणवत्तेचा वाव देऊ शकतो. विद्यार्थ्यांमध्ये असणारी विविधता अपरिहार्य आहे आणि प्रत्येकाच्या गरजा वेगळ्या आहेत. हे शिक्षकाच्या लक्षात आले पाहिजे. ही भिन्नता लक्षात घेऊन शिक्षकाने वर्गामध्ये मानसिक आणि भौतिक पर्यावरण निर्माण केले पाहिजे अशा पर्यावरणात प्रत्येक विद्यार्थ्याला प्रगतीची संधी उपलब्ध होईल.

सर्व शिक्षण अभियानामार्फत प्रत्येक अक्षम विद्यार्थ्यासाठी ₹ 1200 ची तरतूद आहे या पैशाचे नियोजन करताना ही रक्कम फक्त विशिष्ट मुलाच्या खर्चासाठी आलेली नसून या पैशाचे नियोजन

करताना सर्व समावेशक शाळेमधील उपक्रमांचा विचार करून त्या प्रमाणे पैशाचे नियोजन केले गेले पाहिजे. जिल्ह्यामध्ये जितके अक्षम विद्यार्थी आहेत त्या सर्वासाठी सर्व शिक्षण अभियानाच्या राज्यशाखेमार्फत रक्कम सर्वसमावेशक शाळांना पाठविली जाते. यापैकी काही अक्षम विद्यार्थ्यंना खास शिक्षकाची गरज असते. काहींना कर्ण यंत्राची गरज असते. ही रक्कम दरवर्षी खर्च केलीच पाहिजे असेही बंधन नाही ही रक्कम 2-3 वर्षे साठवून देऊन योग्य कारणासाठी खर्च केली तरी चालते.

या खेरीज ही रक्कम आणखी काही उपक्रमांवर देखील खर्च केली जाऊ शकते. उदा. मूल्यमापन शिबीरे, अद्ययन साहित्य निर्मिती, समाजजागृती मोहिम, भारतीय 45 दिवस पुनर्वसाहत मंडळाने मान्यता दिलेले शिक्षक प्रशिक्षण, बिनसरकारी संघटनाच्या काही सेवा, शिबीरे आणि चर्चासत्रे अक्षम विद्यार्थ्यांना उपकरणे आणि इतर मदत पोहोचविण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे ते शक्य झाले नाही. तर सर्व शिक्षा अभियानाची रक्कम वरील कारणांसाठी खर्च झाली पाहिजे. दिव्यांग विद्यार्थी त्याच्या कुटूंबातच राहिला पाहिजे. उपलब्ध असलेल्या स्त्रोतांचा विचार करून प्रत्येक जिल्ह्याने आपल्या अधिपत्याखाली असलेल्या दिव्यांगांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सर्वसमावेशक शिक्षण पद्धतीत दिव्यांगाना सर्वसाधारण शाळेतच पाठविले पाहिजे. त्यांच्यासाठी वेगळ्या शाळा उघडून त्यांना एकटे पाडू नये.

## 9.5 शाळेमध्ये मुलांच्या हक्कांचे रक्षण

डिसेंबर 2005 मध्ये संसदेने संमत केलेल्या काद्यानुसार 'मुलांच्या हक्काचे रक्षण करण्याचा कायदा 2005 आयोग' स्थापन करण्यात आला. या आयोगाच्या अधिपत्याखालली 'मुलांच्या हक्काचे संरक्षण राष्ट्रीय आयोग' नेमण्यात आला.

भारतीय राज्यघटना आणि यूनोच्या सभेत मुलांच्या हक्कांचे धोरणात ठरल्याप्रमाणे राष्ट्रीय आयोगाच्या जनादेशानुसार सर्व कायदे, सर्व धोरणे, सर्व उपक्रम आणि सर्व प्रशासकीय यंत्रणा मुलांच्या हक्कांचे संरक्षणास अनुकूल असणारी असावी. आंतराष्ट्रीय कायद्यानुसार 18 वर्षाखालील प्रत्येक व्यक्ती मूल या संज्ञेला प्रात्र आहे. मुलाची ही व्याख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य करण्यात आली असून ही व्याख्या यूनोच्या सभेत स्वीकारण्यात आली आहे. भारतामध्ये 18 वर्षाखालील व्यक्तिला वेगळी कायदेशीर व्यक्ती म्हणून मान्यता दिली आहे. 18 वर्षाच्या झाल्यानंतर आपण मतदार होतो, सज्ञान होतो, आपणास गाडी चालविण्याचा परवाना मिळतो. किंवा त्यांना कायदेशीर करारमदार करता येतात.

सर्व मुलांना संरक्षणाची गरज असते. ही गरज त्यांच्या सामाजिक, आर्थिक किंवा वस्तीच्या ठिकाणावर सुद्धा अवलंबून असते. काही मुले अतिशय संवेदनशील असतात. त्यांना तर ही गरज तीव्रतेने भासते.

संरक्षणाची गरज असणारी मुले – बेघर मुले (फूटपाथवर राहणारी / हाकलून दिलेली, निर्वासीत) भटकी मुले, रस्त्यावरील आणि पळून आलेली मुले, बालकामगार, भीक मागणारी मुले, शरीरविक्री करणाऱ्या स्त्रियांची मुले, अनैतिक व्यवहारात गुंतलेली मुले, सुधारगृहातील मुले, भांडणामुळे बाहेर पडलेली मुले, नैसर्गिक आपत्तीमुळेबेघर झालेली मुले एड्स / एच आय व्ही ग्रस्त मुले, असाध्य रोगाने ग्रासलेली मुले, अक्षम मुले, अनुसूचित जाती जमातीची मुले.

आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि आपल्या देशाने मान्य केलेले सर्व हक्क कायद्याने 18 वर्षाखालील मुलांना मिळतात.

**भारतीय संविधानामध्ये मुलांसाठी काही हक्काची तरतूद खास करण्यास आली आहे. हे हक्क पुढीलप्रमाणे :**

1. वयोगट 6-14 मधील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क (संविधान कलम 21 A)

Notes

2. वय वर्षे 14 पर्यंत कोणत्याही धोकादायक कामापासून संरक्षण मिळण्याचा हक्क (संविधान कलम 24)
3. आर्थिक गरजेमुळे वयाला आणि ताकतीला न झेपणाऱ्या धोकादायक व्यवसायात काम करण्यापासून मना करण्याचा हक्क शिवीगाळीपासून संरक्षण हक्क (संविधान कलम 39 (e))
4. योग्य तऱ्हेने विकास होण्यासाठी समान संधी 39 (91) आणि समान सुविधा स्वतंत्र आणि सन्माननीय रित्या मिळण्याचा हक्क बालपण जपण्याचा हक्क तरुणांच्या अयोग्य फायदा घेण्यापासून जपण्याचा आणि नैतिक व भौतिकदृष्ट्या वाळीत न टाकण्याचा हक्क (संविधान कलम 39 (f))

**या खेरीज भारतातील इतर स्त्री पुरुषांना नागरिकाचा जो हक्क आहे, तसा समान नागरिकाचा हक्क त्यांना मिळेल.**

1. समानता अधिकार (संविधान कलम 14)
2. अनुचित सापत्न भावाविरुद्ध अधिकार (संविधान कलम 15)
3. वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क, योग्य त्या कायदेशीर प्रक्रियेचा हक्क (संविधान कलम 21)
4. समाजातील वंचित घटकांचे सामाजिक अन्याय व शोषणाविरुद्ध संरक्षण हक्क (संविधान कलम 46)

**संशोधनातून कागदपत्रातून आणि शासनाने केलेल्या सामाजिक हस्तक्षेपातून आणि समाजातल्या भूतकाळातल घटनांनी बाल संरक्षणाचे अनेक मुद्दे पुढे आणले आहेत. त्यापैकी शालेय शिक्षणाशी संबंधित मुद्दे पुढीलप्रमाणे :**

लिंगभेद पक्षपात, जाती आधारित पक्षपात, अक्षमता, शाळेतील शारीरिक शिक्षा, परीक्षांचा दबाव विद्यार्थी, आत्महत्या इ.

शाळेतील शिक्षकांची मुख्य जबाबदारी म्हणजे शाळेतील विद्यार्थ्यांच्या हक्कांची जपणूक करणे आणि शालेय परिसरात त्यांच्यावर कोणताही प्रकारचा अन्याय होऊ नये अशी काळजी घेणे ही आहे.

## 9.6 सारांश

भारतीय समाज ही जगातल सर्वात विषम सामाजिक संघटना आहे. व्यक्ती, परिवार, समुदाय, जाती या सर्व ठिकाणी प्रचंड विषमता दिसून येते. त्यामुळे त्यांचा साधनसंपत्ती व शिक्षण यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोण सर्वस्वी निराळा असतो. देशातील काही राज्यांमध्ये काही सामाजिक गट असे आहेत. की जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत गरजा ते भागवू शकत नाहीत, मग सुखाने आयुष्य जगणे दूरचीच गोष्ट आहे. विशिष्ट जातीचे / जमातीचे असल्यामुळे समाजातील काही घटकांना अतिशय तुच्छतेची वागणूक मिळते. उदा. अनुसूचित जाती / जमातीचे लोक, स्त्रिया, अगदी दूर अंतरावर किंवा डोंगराळ भागात राहणारे लोक, शारीरिकदृष्ट्या अक्षम लोग, मूक बधिर, अंध, मंदबुद्धि या गटात असणाऱ्या मुलांना सुविधा वंचित मुले असे म्हणतात. असे म्हणण्याचे कारण त्यांना इतर मुलांना मिळत असलेले सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुविधा उपलब्ध होत नाहीत. या मुलांना विशिष्ट गरजा असलेली मुले असेही म्हणतात. या घटकपाठात अशा वंचित मुलांच्या शिक्षणाविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. आपले प्रयत्न नेहमी या वंचित विद्यार्थ्यांना सर्वसाधारण विद्यार्थ्यांबरोबर आणणे असे आहेत.

या पाठात आपण विशिष्ट गटांच्या मुलांविषयी चर्चा केली. आपण अनुसूचित जातीच्या व जमातीच्या मुलांचे शिक्षण, विशिष्ट गरजा असणारी मुले, भौगोलिक दृष्ट्या दूर अंतरावर राहणारी मुले, शहरातील सुविधा वंचित मुले, बालकामगार आणि रस्त्यावरील मुले यांचेही शिक्षणाबाबतीत काय व्यवस्था करता येईल याबाबत चर्चा केली आहे.

सर्वसमावेशक शिक्षणाचा संबोध आणि समर्पकता यावरही आपण सविस्तर चर्चा केली आहे. याखेरीज स्वत:ची काहीही चूक नसताना देखील तुच्छ दर्जाचे जीवन जगणारी नागरी झोपडपट्टीतील मुले, कारखान्यात काम करणारी मुले, दुकानात / हॉटेलात काम करणारी मुले किंवा अतिशय नाईलाज झाल्याने भीक मागणारी मुले यासंबंधी आपण चर्चा केली आहे. भारतीय संविधानाने मुलांना काही हक्क दिले आहेत. त्यांचे आपण कोणत्याही परिस्थितीत रक्षण करणे आवश्यक आहे.

Notes

## 9.7 पूरक वाचन व संदर्भ

www.oecd.org/
www.wpi.edy/News/Conf/ISTAS/Presentations/iteducation/pdf
Centre for Research on Effective Schooling for Disadvantaged.
www.csos.jhu.edu/otherlinks/cds/cds.html
nvpie.org/**inclusive**.html.
www.ibc.unesco.org/.../Interviewo_Clementina Eng 13Nov.p df

## 9.8 स्वाध्याय

1. सुविधा वंचित विद्यार्थ्यांच्या समस्या ; त्यांचे निवारण आणि क्षमता यांची चर्चा करा.
2. शाळा आणि वर्ग यांच्या संबंधात सर्व समावेशक शिक्षणाची व्याख्या करा.
3. सर्वसमावेशक शिक्षणाचे फायदे सांगा.

# घटक 10 : प्राथमिक शिक्षणाची जागतिक स्थिती

Notes


**स्वरुप :**

10.0 प्रास्ताविक
10.1 अध्ययन उद्दिष्ट्ये
10.2 जोमतीन परिषद (1990)
 10.2.1 जोमतीन परिषदेतील प्रमुख भर
 10.2.2 आंतरराष्ट्रीय एक्याची भर
 10.2.3 जोमतीन E. 9 देशांचा परिणाम
 10.2.4 दक्षिण आशियावरील परिणाम
10.3 विकसनशील देशातील प्राथमिक शिक्षणाचा पुढाकार
10.4 आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिका UEE
 10.4.1 UNESCO
 10.4.2 UNICEF
 10.4.3 World Bank (जागतिक बँक)
 10.4.4 DFID
 10.4.5 SIDA
10.5 जागतिक शैक्षणिक परिषद – डाकार सेनेगल 2000
10.6 सारांश
10.7 संक्षिप्त रूपे
10.8 संदर्भ
10.9 स्वाध्याय

## 10.0 प्रस्तावना

घटक 1 आणि 2 मध्ये स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील प्राथमिक शिक्षणाचा विकास पाहिलेला आहे. भारतीय राज्य घटनेने शिक्षण हा मूलभूत हक्क म्हणून त्याचा समावेश घटनेत केलेला आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण वेगवेगळ्या पातळीवर केले जाते. प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी शासनाने काही योजना आखलेल्या आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राथमिक शिक्षणाबाबत डाकार येथील सन 2000 मध्ये जोमतीएन परिषद आणि सेनेगल येथील जागतिक शिक्षण परिषदेतील माहिती घेवू. याशिवाय विकसनशील आणि विकसित देशातील प्राथमिक शिक्षणाचा आढावा घेवू. जागतिक संघटनांची सर्वांसाठी शिक्षण (Education for all - EFA) यांचीही भूमिका पाहू. सदरच्या संकल्प आराखड्यातून आपणास याची नीट कल्पना येईल.



Notes

## 10.1 अध्ययन उद्दिष्ट्ये

**सदरचा पाठ्य अभ्यासानंतर पुढील गोष्टी साध्य होतील.**

- सन 1990 ची जोमेती परिषदेचा मुख्य संकल्पाचे वर्णन
- E. 9 देश आणि दक्षिण आशियायी देश यावर झालेला परिणामाचे परिक्षण
- विकसनशील व विकासित देशातील प्राथमिक शिक्षणाच्या स्थितीची तुलना
- प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणावर आंतरराष्ट्रीय संस्थांचा परिणाम स्पष्ट करणे.
- सन 2000 च्या डाकार व सेनगरच्या जागतिक शिक्षण परिषद 2000 चा आढावा.
- ''सर्वांसाठी शिक्षण'' या भूमिकेचे महत्त्व

## 10.2 जोमेतीयन परिषण 1990

सर्वांसाठी शिक्षण ही परिषद 5 ते 9 मार्च 1990 या काळात जोमेतीयन, थायलँड येथे झाली. येथे राष्ट्रसंघांचे 155 राष्ट्रांचे सदस्य उपस्थित होते. सर्वानुमते सर्वांसाठी शिक्षण यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. आणि उद्देशाची पायाभरणी करण्यात आली. यासाठी सर्वांनीच सहकार्य करण्याची सहमती दर्शविली. शिक्षणासाठी मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी उद्दिष्टांचा कृती आराखडा तयार करण्यात आला.

सर्वांसाठी शिक्षण जागतिक परिषदेतील सहभाग

- संपूर्ण जगातच सर्वांसाठी शिक्षण हा कोणत्याही वयाच्या व्यक्तीला मूलभूत अधिकार आहे.
- शिक्षणामुळे सुरक्षित, आरोग्यदायी आणि अधिक संपन्न असे जागतिक पर्यायवरण राहिलं याची कल्पना येईल.
- व्यक्तीगत आणि सामाजिक उन्नतीसाठी शिक्षण हा अविभाज्य घटक आहे याची जाणीव व्हावी.
- पारंपारिक ज्ञान, स्वदेशी आणि सांस्कृतिक मूल्ये ही विकासाचा पाया आहे.
- सध्याच्या शैक्षणिक सुविधांची माहिती घेणे आणि त्यांच्या गुणवत्तेत सुधारणा करून सहज उपलब्ध व्हाव्यात.
- व्यक्तिगत विकासासाठी मूलभूत शिक्षण परिपूर्ण असले पाहिजे. ज्यामधून शैक्षणिक दर्जा उंचावेल व विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षणाची साक्षरता आणि पात्रता वाढीस मदत होईल.

### 10.2.1 जोमेतीयन परिषदेचा प्रमुख भर

या परिषदेमध्ये नऊ ठराव करण्यात आले, त्यामध्ये सर्वांसाठी शिक्षणाचा हेतू, दूरदृष्टी, पूर्तता आणि गरजा यांचा समावेश केला. या परिषदेमधील महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे :

**i. अध्ययनातील मूलभूत गरजांची पूर्तता**

a) बालके, युवक आणि प्रौढ या प्रत्येकाला शिकण्यासाठी मूलभूत गरजांची पूर्तता व्हावी. प्रत्येक देशातील मूलभूत गरजांची व्याप्ती भिन्न असून आपापल्या संस्कृती आणि साधनांप्रमाणे आणि काळाप्रमाणे विविधता असेल.

b) व्यक्तिगत सबलीकरणासाठी एकत्रीतपणे सांस्कृतिक भाषिक आणि वारसांचा उपयोग इतरांसाठीही व्हावा.

Notes

c) शैक्षणिक विकासाचा मूळ हेतू म्हणजे सामाईक संस्कृती नैतीक मूल्य समृद्ध करणे. यामधून व्यक्तिगत व समाजाची ओळख सिद्ध व्हावी.

d) आयुष्यभर शिक्षणासाठी आणि मानवी विकासासाठी मानवी मूलभूत शिक्षण हा पाया आहे.

**ii. दृष्टीकोनाला दिशा**

a) सध्याच्या प्रचिलित पद्धतीपेक्षा दूरदृष्टीने विचार केला जाणे आवश्यक आहे. सध्याच्या पद्धतीमध्ये संस्थात्मक रचना, अभ्यासक्रम, संवाद साधनांमध्ये बदल आवश्यक आहे.

b) प्रचलित पद्धतीपेक्षा वेगळी दूरदृष्टी

- सार्वत्रिकरणास सुलभ व समानतेवर भर
- अध्ययनावरच भर
- विशाल दृष्टीकोन व मूलभूत शिक्षणाला वाव
- पर्यावरण शिक्षणावर भर
- बळकट सहयोग

c) मानवामध्ये प्रचंड सुप्त शक्ति आहेत. हे सत्य आहे. परंतु शिक्षणामुळेच त्यांचे सबलीकरण होवू शकेल.

**iii. सार्वत्रीकरणाच्या सहाय्याने समानतेला वाव**

a) मूलभूत शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीने व सतत उपाययोजनांमुळे विषमता दूर होईल.

b) मूलभूत शिक्षण सर्वांना समान संधीने मिळाले पाहिजे तसेच समान पातळीवर मिळणे आवश्यक आहे.

c) मुली आणि महिलांच्या शिक्षणातील अडथळे दूर करून प्राधान्याने त्यांना गुणवत्ता प्रधान शिक्षण मिळाले पाहिजे.

d) शिक्षणातील विषमता दूर करून अपात्र गटाला विषमता नसल्याची खात्री झाली पाहिजे.

e) दिव्यांग व्यक्तीच्या शैक्षणिक गरजा अधिक असतात. त्यांच्या शिक्षणासाठी समान संधी देणे हा अविभाज्य घटक आहे.

**iv. अध्ययन दृष्टी**

विस्तारीत शैक्षणिक संधी म्हणजेच अर्थपूर्ण विकास म्हणता येईल. व्यक्तीगत असो किंवा समाज असो, या संधीमुळे लोक शिकतात. का हे पाहणेही आवश्यक आहे. मूलभूत शिक्षणाचा मूळ हेतूच असा आहे की किती लोकांना ही संधी मिळालेली आहे. हे पाहणेही गरजेचे आहे.

**v. विशाल दृष्टीकोन व मूलभूत शिक्षणाची व्याप्ती**

खालील बाबींमुळे मूलभूत शिक्षणाची व्याप्ती वाढेल त्यासाठी त्यांच्या गरजांनुसार विविधता व रचनेत बदल करावा लागेल.

- शिकणे ही उपजत प्रवृत्ती आहे.
- मूल हे कुटुंबाच्या बाहेर मूलभूत शिक्षण घेणार आहे.
- युवक व प्रौढ यांच्या शिक्षणाचा मूलभूत शिक्षण हा पाया आहे त्यामुळे त्यांना विविधतेचे शिक्षण आवश्यक आहे.
- सामाजिक प्रश्नाच्या सहाय्याने उपलब्ध साधने, माहितीप्रसार माध्यम व सामाजिक प्रतिक्रिया यांचा ज्ञानासाठी उपयोग करता येईल.

Notes

**vi. अध्ययनात पर्यावरणाचा विकास**

शिक्षणातून पोषण घटक, आरोग्याची निगा, शारीरिक, भावनिक आधार इ. बाबी मिळतात. ज्ञान आणि कौशल्य यातून मुलांचे शैक्षणिक वातावरण तयार होईल आणि प्रौढांच्या शैक्षणिक उपक्रमास उपयुक्त ठरेल. मुलांचे शिक्षण आणि पालक व त्यांचे संगोपन करणारे यांच्या एकमेकांच्या प्रेमळ सुसंवादामुळे शैक्षणिक वातावरण तयार होईल.

**vii. भक्कम सहयोग**

राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक शिक्षण अधिकारी यांनी सर्वांसाठी शिक्षण हे उपलब्ध करणे बंधनकारक आहे. त्यासाठी सर्व पातळीवरील परस्परांशी सहयोग असणे आवश्यक आहे. त्यासाठी कुटुंब आणि शिक्षक यांची महत्त्वाची भूमिका आहे. सदरच्या गोष्टीमध्ये शिक्षकाची नोकरी, दर्जा सेवाशर्ती याबाबत जगातील सर्वच सुधारणा होणे तातडीची गरज आहे.

**viii. पुरक पाठबळ**

a) मूलभूत शिक्षणासाठी सामाजिक, सांस्कृतिक आर्थिक पाठबळाची गरज आहेत, तरच व्यक्तिगत व सामाजिक सुधारणा होईल. सुयोग्य आर्थिक, व्यापार, मजूर, सेवा आणि आरोग्य धोरणे ही अध्ययनास प्रवृत्त करील त्यातून सामाजिक विकास दिसून येईल.

b) मूलभूत शिक्षणासाठी बौद्धिक व वैज्ञानिक वातावरण आहे याची समाजाला खात्री पडली पाहिजे.

**ix. गतीमान साधने**

a) अध्ययनाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी सध्याची आणि नवीन साधनांची जुळवाजुळव करणे मानवी संसाधन, सार्वजनिक अथवा खाजगी किंवा स्वेच्छेने दिल्या जाणाऱ्या साधनांची गरज पूर्ती करणे.

b) सार्वजनिक क्षेत्र विस्तृत करणे, शासनाच्या विविध विभागाकडून ही संसाधने मिळविणे यावर मानवी विकास अवलंबून आहे.

## 10.2.2 आंतरराष्ट्रीय ऐक्य मजबूत करणे.

a) मूलभूत शिक्षणाची गरज भागविणे ही अखिल मानवजातीची जबाबदारी आहे. त्यासाठी जागतिक स्तरावर ऐक्य घडवून आणणे आवश्यक असून आणि समान व निर्भेळ आर्थिक संबंध प्रस्थापित करून आर्थिक विषमता दूर करणे आवश्यक आहे. सर्वच देशांना शैक्षणिक धोरण आणि कार्यक्रमाची माहिती आहे.

b) उत्तम आणि टिकावू संसाधने वाढविणे ही मूलभूत शिक्षणाची गरज आहे.

c) मूलभूत शिक्षणाची साधने कोठे उपलब्ध होतात. याची कल्पना प्रौढ आणि मुलांना आवश्यक आहे.

d) संपूर्ण देशाने या उपक्रमासाठी युद्धपातळीवर लढा देवून काम करणे गरजेचे आहे तरच हा गोंधळ मिटेल.

स्थिर व शांततापूर्ण वातावरणामध्ये प्रत्येकाला या उद्दिष्टांचा लाभ मिळेल. जोमतीएन परिषदेत सहा प्रमुख मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी क्षेत्रे निवडलेली आहेत.

- **प्रमुख क्षेत्र**

a) बालसंगोपन केंद्राचा विकास करणे.

b) प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी सर्वसमावेशक धोरण.

c) अध्ययन पूर्तीतील सुधारणा

Notes

d) प्रौढ निरक्षरता कमी करणे.
e) मूलभूत शिक्षणाचा विस्तार करून युवक व प्रौढांना कौशल्य प्रशिक्षण देणे.
f) ज्ञान माध्यमातून व्यक्तिगत व कौटुंबिक जीवनमान वाढविणे.

सर्वांसाठी शिक्षण ज्या जाहिरनाम्यातील मूलभूत तत्त्व –

- **पाच मूलभूत तत्त्वे**

a) समानता–सर्वसमावेशनासाठी न्याय्य समानता
b) अध्ययनावर भर
c) मूलभूत शिक्षणाचा अर्थ व व्याप्तीचा विस्तार करणे.
d) अध्ययन पर्यावरणात सुधारणा करणे.
e) भागीदारीतील सहभाग बळकट करणे.

सर्वांसाठी शिक्षणाच्या ध्येय व उद्दिष्ट पूर्तीसाठी तयार केलेला आराखडा

- **प्रमुख ध्येये व उद्दिष्ट**

a) सन 2000 पर्यंत 80 टक्के पर्यंत मूलभूत शिक्षण पोहचविणे.
b) 1990 च्या प्रौढ निरक्षरांचे प्रमाण सन 2000 पर्यंत निम्म्यावर आणणे. त्यासाठी स्त्री निरक्षरतेवर भर देणे.
c) शैक्षणिक उद्दिष्ट्ये संपादन करणे (80%) विशिष्ट वयोगट एकत्र करणे किंवा त्यापेक्षा अधिकाअधिक वयासाठी अध्ययन क्षमता संपादन करणे.
d) बालसंगोपन केंद्राचा विस्तार करून, गरीब, अक्षम व वंचित घटकातील मुलांची काळजी घेणे. त्यांचा विकास करणे.

- **जोमेतीन परिणाम**

जोमतीन परिषदेचा परिणाम राष्ट्रीय सरकार त्यांची धोरणे, योजनावर झाला. या परिषदेचा परिणाम पुढीलप्रमाणे :

a) मूलभूत शिक्षणाच्या व्याप्तीमुळे प्रौढ साक्षरता युवकांना प्रशिक्षण, कौशल्य शिक्षण, बाल संगोपन केंद्र तसेच बालवाड्यांचा विकास झाला.
b) सर्वांसाठी शिक्षणाच्या आराखड्याला प्राधान्य.
c) सर्वांसाठी शिक्षणाच्या आधारावर शैक्षणिक आराखडा तयार करून विशेष कार्यक्रम तयार करून सर्वांसाठी शिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये भर टाकावी.
d) सध्याच्या कार्यक्रमामध्ये शाळा सुधारणा करून त्यामध्ये भर टाकावी. त्यामध्ये विस्तार, गुणवत्ता सुधारणा, शिक्षक प्रशिक्षण, अभ्यासक्रम पुनर्रचना, स्त्रीपुरुष समानता, वंचित व गरीबांसाठी कार्यक्रम राबवावा.
e) शैक्षणिक विकासासाठी प्रकल्प राबविणे.

- **राष्ट्रीय शासनावर परिणाम**

a) विशेष बाब म्हणून कार्यक्षमतेने शिक्षण व्यवस्थेमध्ये नियोजन व व्यवस्थापनात सुधारणा करावी.
b) शिक्षण व्यवस्थेच्या नियोजन व व्यवस्थापनामध्ये विकेंद्रीकरण करावे.
c) शैक्षणिक अक्रमामध्ये सामाजिक सहभागाची यंत्रणा विकसित करावी.
d) शासकीय आणि अशासकीय संघटनांची सहभाग वाढवावा.

**विशेष परिश्रमांचा प्रारंभ**

a) स्थानिक संसाधने वापरून कर आणि वसुलीत सुधारणा करावी.
b) समाजाकडून रोख अथवा वस्तुस्वरूपात संसाधने मिळवावीत. मानवी व अमानवी संसाधनांचा उपयोग नियोजन, व्यवस्थापन पर्यवेक्षणातून यंत्रणा चालू राहण्यासाठी करावा.
c) परस्परातील सहकार्य वाढविणे.
d) बाह्य संसाधने – परदेशीय मदतीचा उपयोग करावा.



## 10.2.3 E - 9 वेशांतर जोमतीएनचा परिणाम

E - 9 देश म्हणजे बांगला देश, ब्राझिल, चीन, इजिप्त, भारत, इंडोनेशिया, मेक्सिको, नायजेरिया आणि पाकिस्तान या देशातील लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या 50% पेक्षा अधिक आहे. त्यांना E 9 देश म्हणतात. ब्राझीलने 31 जानेवारी ते 2 फेब्रुवारी 2000 EFA (सर्वांसाठी शिक्षण) योजना सुरू केली. मार्च 1990 मध्ये जोमेतीएन परिषद झालेली होती आणि डिसेंबर 1993 ला E9 या देशाच्या प्रतिनिधींची परिषद नवी दिल्ली येथे झाली. त्यापासून या देशामध्ये अमूलाग्र बदल झाला.

E 9. देशात जोमतीएन परिषदेमध्ये पुढील उद्दिष्ट्ये साध्य झाली.

- प्रौढ निरक्षरतेमध्ये अमूलाग्रह घट झाली.
- बालवाड्या अंगणवाड्यांची संख्या वाढली त्याला पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.
- उत्तमपणे शालापूर्व शिक्षणाच्या सुविधा सुरू झाल्या.
- व्यापक स्वरूपात प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ झाला.
- मुले व मुली एकत्र शिकल्याने स्त्री–पुरुष समानतेचे शाळा हे माध्यम ठरले.
- नागरी शिक्षणामुळे वृत्ती व मूल्ये यांचा परिचय झाला.
- शैक्षणिक सुविधांचे विकेंद्रीकरण झाले.
- विशेष गरजा असणाऱ्या मुलांचा समावेश सर्वसमावेशक शिक्षणामध्ये झाला.
- अध्ययनाची दूर शिक्षण सोय झाल्याने शिक्षक प्रशिक्षण सुलभ झाले.
- विशिष्ट उद्देश असणाऱ्या गटासाठी अचूक उपाययोजना करता आली.
- अशासकीय संस्था (NGO) नागरी संस्था खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढला.
- राष्ट्रीय पातळीवर मूल्यमापन पद्धती शिक्षण क्षेत्रामध्ये आली.
- सर्वांसाठी शिक्षण ही सार्वजनिक जाणीव निर्माण झाली.
- यासाठी प्रसारमाध्यमे व पुरस्कर्ते यांची मदत झाली.

## 10.2.4 दक्षिण आशियावरील परिणाम

जोमतीएन परिषदाचा प्रभाव म्हणून दक्षिण आशियात नव्याने काही योजना व कार्यक्रम राबविले. उद्दिष्टांमध्ये कमी अधिकपणा करून नवीन कल्पना राबविल्या व संख्यात्मक उद्दिष्ट्ये गाठली. दक्षिण आशियाची देशांमध्ये बांगला देश, भूतान, भारत, मालदिवे नेपाळ, पाकिस्तान अफगाणिस्तान श्रीलंका यांचा समावेश होतो.

**दक्षिण आशियाने साधलेली उद्दिष्ट्ये :**

- प्राथमिक शाळेतील विद्यशर्थ्यांची संख्या वाढली.
- बालवाड्या अंगणवाड्या यांचा शैक्षणिक सहभाग वाढला.
- गुणवत्तेला प्राधान्य दिले.

- कार्यात्मक प्रौढ साक्षरता वाढली.
- शैक्षणिक व्यवस्थापन व माहितीमध्ये सुधारणा झाली.
- मूलभूत शिक्षणावरील खर्चासाठी अंदाजपत्रकात वाढ करण्यात आली.
- उपलब्ध साधनांचा परिणामकारक वापर करण्यात आला.
- मूलभूत शिक्षणासाठी आंतरराष्ट्रीय मदतीस वाढ झाली.
- मूलभूत शिक्षणामध्ये कायदेशीर उपाय, मार्गदर्शन, प्रकल्प यामध्ये बदल झाले.

म्हणून शिक्षणासाठी राष्ट्र संघाच्या विविध घटकांनी मिळून विकसनशील देशांसाठी मदत करण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळे या परिषदेचा निश्चितच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष उपयोग झाला.

## 10.3 विकसनशील देशातील प्राथमिक शिक्षणाला चालना

जगातील अनेक भागात प्राथमिक शिक्षण दुर्लक्षित आहे. E 9 देशांच्या जाहिरनाम्याप्रमाणे मूलभूत शिक्षणासाठी आराखडा तयार केला. अगदी 40 वर्षापूर्वी स्थापन झालेल्या मानवी हक्काने सुद्धा प्राथमिक शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे याचा आग्रह धरला. विकसित आणि अविकसित देशातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती सदरच्या भागामध्ये अभ्यासणार आहोत.

जगातील 7.5 कोटी मुलांपैकी निम्म्यापेक्षा अधिक मुलांना प्राथमिक शिक्षणाची संधी प्राप्त होत नाही. आफ्रिकेतील एक तृतीयांश मुले शिक्षणापासून वंचित आहेत. ग्रामीण भागातील चार पंचमांश मुले शाळेतच जात नाहीत. विकसनशील देशातील मुली शाळेच्या पटावर दिसत आहेत. परंतु आफ्रिकेतील सहारा वाळवंटाला लागून असलेल्या मध्यपूर्व भागात तसेच दक्षिण व पश्चिम आशियामध्ये मुलांना शाळेत पाठविण्यास प्राधान्य आहे.

त्याचप्रमाणे युद्धजन्य परिस्थिती आणि संघर्ष यामुळे मुलांना शाळेत पाठविले जात नाही. अनेक देशातील शाळा यादवी युद्धातील हल्ल्यामुळे उध्वस्त झालेल्या आहेत.

विकसनशील देशातील प्राथमिक शिक्षणातील अडथळे पुढील कारणांवरून लक्षात येईल.

- **अपुरे अर्थ सहाय्य :** सर्वांसाठी सक्तीचे शिक्षण यासाठी विकसनशील देशातील अर्थसहाय्य अपुरे आहे. त्यासाठी अधिक पैशाची तरतूद करणे आवश्यक आहे. भोंगळ कारभार, मनुष्य बळ अभाव, भ्रष्टाचार, अपुऱ्या आर्थिक तरतुदी, व्यवस्थापन व संघटन कौशल्य अभाव यामुळे सार्वत्रिक शिक्षणामध्ये अडचणी आहेत.
- **शिक्षकांची कमतरता :** ग्रामीण व दरिद्री जिल्ह्यांमध्ये प्राथमिक शाळांची संख्या कमी आहे. शाळेसाठी मुलांना दूर अंतरापर्यंत जावे लागते. पालकांना असुरक्षित वाटल्यामुळे मुलींना शाळेत पाठविले जात नाही. अनेक शाळांमध्ये शैक्षणिक साधनांचा अभाव आहे. त्यामध्ये पाठ्यपुस्तके शैक्षणिक साधनेही नाहीत. पिण्याचे पाणी, वीज, मुलांची ने आण करण्याची व्यवस्थाही नाही. शिक्षकांची स्थिती अतिशय दयनीय आहे. अनेक शिक्षकांना अपुरा पगार आहे. तर विद्यार्थी संख्या जास्त असलेल्या ठिकाणी दोन–तीन सत्रामध्ये काम करावे लागते. साधनांचा अपुरेपणा आहेच परंतु शिक्षकांना प्रशिक्षणही नाही. आफ्रिकेतील सहाराच्या भागात आरोग्याच्या समस्या आहे. एडस् ग्रस्त शिक्षकांमुळे पालक मुलांना शाळेत पाठवित नाहीत. त्यामुळे शाळाच बंद आहेत. विकसनशील शाळेतील अध्यापनही कनिष्ठ दर्जाचे आहे. अध्यापनाच्या वेळा अभ्यासक्रम याबाबत दैनंदिनी सांभाळली जात नाही. समुह कामकाज स्वायत्त अध्ययन टीकात्मक विचार सरणी, समस्या निराकरण, नवीन तंत्र जीवन कौशल्ये इत्यादींचा अध्यापनामध्ये समावेश करणे आवश्यक आहे.

- **न परवडणाऱ्या शाळा :** विकसनशील देशातील अनेक पालकांना शाळेची फी, शालेय साहित्य, शाळा गणवेश, वाहतूक खर्च परवडत नाही. फी माफीमुळे काही शाळातील विद्यार्थी संख्या वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. अनेक कुटुंबे अशी आहेत की मुलांच्या कमाईवर घर चालवितात. वय वर्ष 5 ते 14 च्या दरम्यानची 16 कोटी 60 लाख मुले सोळा सोळा तास काम करतात. सहारा वाळवंटाच्या सरहद्दीवर तर एकचतुर्थांश मुले तर आशियातील एकपंचमांश मुलांना मजुरी करावीच लागते.
- **निरक्षरतेचे अधिक प्रमाण :** विकसनशील देशातील 30 ते 40 टक्के मुले चार ते सहा वर्षाच्या प्राथमिक शिक्षणामध्ये साक्षर होत नाहीत तसेच त्यांना अंकही समजत नाहीत. वय वर्षे 15 ते 24 च्या दरम्यातील निरक्षरांची टक्केवारी 11 टक्के आहे. एकूण निरक्षरांपैकी विकसनशील देशातील 96% लोकांना लिहिता वाचता येत नाही.

## 10.4 प्राथमिक शिक्षणाच्या सर्वत्रिकीकरणामध्ये आंतरराष्ट्रीय संस्थांचे कार्य

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामध्ये जगभरच्या आंतरराष्ट्रीय संस्था कार्यरत आहेत. त्यामधून चांगल्या प्रकारे उद्दिष्ट साध्य होत आहे. उदा. जागतिक बँक (World Bank) आशियायी विकास बँक, USAID, DFID, NORAD, CIDA, SIDA, SDC इत्यादी संस्था सार्वत्रिक शिक्षणाला सहकार्य करीत आहे.

### 10.4.1 (UNESCO) युनेस्को

United Nations Educational, Scientific and Cultural Organization ही संख्या लंडन परिषदेमधे सन 1945 मध्ये स्थापन झाली. शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्राराष्ट्रामध्ये शांतता व सहकार्य लाभावे हा हेतू होता. युनेस्कोचे मुख्य कार्यालय पॅरिस येथे आहे. शिक्षणामुळे शांतता नांदेल व आर्थिक विकास होईल. युनेस्कोच्या माध्यमातून नवनिर्मित स्वतंत्र झालेल्या देशांना साधने, मनुष्यबळ उपलब्ध होईल त्याचा शैक्षणिक विकासासाठी उपयोग होईल. त्या त्या देशातील शैक्षणिक पातळी उंचावेल. त्यांच्या शिक्षकांना प्रशिक्षण, अभ्यासक्रम निर्मितीसाठीही मदत होईल आणि युनेस्कोकडून सर्वांसाठी शिक्षण हा उद्देश पूर्ण होईल. याच संस्थेने जोमेतीएन चर्चासत्र 1990 मध्ये घडवून आणले होते. त्यामुळे ही संस्था माध्यस्त म्हणून काम करत आहे. त्यामध्ये तीन प्रमुख बाबी अशा :

i) कृतिआराखडा – कार्याला गती देण्यासाठी राष्ट्रीय, प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय पातळीवर योजना राबविणे.

ii) मार्गदर्शन – प्रत्येक राष्ट्राने राष्ट्रीय आराखडा तयार करणे. त्यासाठी सहकार्य करणाऱ्या राष्ट्रांचे मार्गदर्शन घेवून तो तयार करणे.

iii) सर्वांसाठी शिक्षण विकासासाठी सहभाग घेणाऱ्या राष्ट्रांकडून योजना तयार करणे. त्यावर चर्चा करणे. इलेक्ट्रॉनिक वार्तापत्र फलक तयार करणे, संपादन केलेल्या दैनंदिन कार्याची नोंद घेणे. युनेस्कोने खालील बाबींची हमी घेतलेली आहे. पाच मुख्य क्षेत्रे.

- युनेस्कोने सर्वांसाठी शिक्षण या उपक्रमास प्रारंभ केला. शिक्षण हा प्रमुख हेतू. परंतु संस्कृती जोडणाऱ्या विविध – गोष्टी, संवाद, माहिती आणि विज्ञान याही बाबींकडे लक्ष दिले.
- सर्वांसाठी शिक्षण यासाठी शैक्षणिक धोरणांमध्ये वंचित राहणाऱ्यांसाठी कार्यक्रम राबविला.
- क्षमता विकासासाठी क्षेत्रीय तंत्राचा वापर करून देशा देशामध्ये आदान प्रदान सुरू केले.

- साधनांचा कार्यक्षम वापर करून मुलभूत शिक्षणात गुंतवणूक वाढविली.
- सर्वांसाठी शिक्षण प्रचारासाठी जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय बैठका घेण्यात आल्या.

### 10.4.2 युनिसेफ

युनायटेड नेशन इंटरनॅशनल चिल्डन्स इमर्जन्सी फंड म्हणजेच युनिसेफ. आरोग्य, पोषण आहार, पाणी, शिक्षण इ. साठी जगतील 150 देशातील शासनाला ही संस्था मदत करते. युनिसेफकडून प्रत्येक मुलाला खात्रीने स्त्री पुरुष भेदभाव न करता कोणत्याही पार्श्वभूमीचा असो त्याला शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे त्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव असता कामा नये. नाविन्यपूर्ण  कार्यक्रम राबविणे हा युनिसेफचा विशाल दृष्टीकोन आहे. सर्वांसाठी शिक्षण हा उद्देश आहे. त्यासाठी सामाजिक न्याय व समानतेसाठी रचनात्मक बदल घडवून आणणे आवश्यक आहे. जगातील अनेक मुले शाळाबाह्य आहेत किंवा त्यांना दुय्यम शिक्षण मिळते आपल्याला चांगले शिक्षण मिळणारच नाही, स्वत:कडे क्षमता असूनही प्रत्यक्षात आपल्याला मिळणार नाही असे त्यांना वाटते युनिसेफने विकासाचा पाया घातला आणि नाविन्यपूर्ण परिवर्तन घडवून समानतेची संधी निर्माण केली. शांततेचा अथवा अशांततेचा काळ असो, शहर असो अथवा खेडे असो कोणतीही तडजोड न करता सर्वांसाठी शिक्षणाची भूमिका आहे.

### 10.4.3 जागतिक बँक

जगातील 90 देशांमध्ये जागतिक बँक सहाय्य करते सर्वांसाठी शिक्षण या उपक्रमासाठी जागतिक बँक अर्थसहाय्य करते त्यांचा मोठा परिश्रम घेतले जात आहेत.

- समानतेच्या तत्वावर सहज प्रवेश मिळावा तसेच अध्ययन उत्तम गुणवत्तेचे मिळावे.
- मुलींची शाळेतील गळती सुधारावी त्यांना उत्तमशिक्षण मिळावे.
- एडसग्रस्त  मुलांनाही शिक्षणाची संधी मिळावी.
- बालकांना प्रारंभापासून विकासाला संधी मिळावी.

### 10.4.4 आतंरराष्ट्रीय विकास विभाग (DFID)

ब्रिटिश सरकारची ही योजना असून विकसनशील देशातील दारिद्र्य कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहे. राष्ट्रसंघाच्या उद्दिष्टप्रमाणे सन 2015 पर्यंत गरीबीच्या उच्चाटनाच्या उपक्रमामध्ये हा विभाग कार्यरत आहे. यांच्या दीर्घकालीन योजना असून दारिद्र्याची कारणे शोधून शासनाला मदत करीत आहेत. धर्मदाय, व्यावसायिक आंतरराष्ट्रीय संस्था, जागतिक बँक, राष्ट्रसंघांचे घटक युरोपियन कमिशन यांची मदत घेतली जाते.

आंतरराष्ट्रीय विकास विभागाचा भारताला लाभ झालेला असून बिहार, मध्य प्रदेश, ओरिसा, पश्चिम बंगाल यांना मदत झाली आहे. राज्य सरकारच्या मदतीने खेड्यातील गरीब, शहरातील झोपडपट्या मध्ये आरोग्य सुविधा शिक्षण, पाणी, स्वच्छतागृहे यासाठी सहाय्य केले जाते. आर्थिक सहाय्यासाठी जागतिक बँक, आशियायी विकास बँक, युनिसेफ यांची मदत घेतली जाते. आंरराष्ट्रीय सहकार्याबरोबर अशासकीय संस्था, खाजगी क्षेत्र उदा. लगुउद्योग विकास बँक यांचीही मदत घेतली जाते.

### 10.4.5 स्विडिश आंतरराष्ट्रीय विकास संघटना (SIDA)

स्विडन या देशाने ही योजना राबविली. त्यांचे जगभर कार्य चालते. त्यांची तांत्रिक मदत होते. अशासकीय संस्थांच्या माध्यमातून विविध प्रकारचे सहकार्य केले जाते. सुमारे 2000 प्रकल्प 100

देशात राबविले जात असून त्याची भागिदारी विविध संघटना, विद्यापीठे, शासकीय संस्था यांच्याशी सहयोग आहे. प्रामुख्याने आफ्रिका, आशिया दक्षिण अमेरिका, मध्य व पूर्व युरोप मध्ये त्यांचे उपक्रम राबविले. जात आहेत.

भारताला सन 1964 पासून स्विडनचे सहकार्य मिळत आहे. शिक्षा कर्मी. प्रकल्प (SKP) सन 1987 पासून राबविला जात आहे. दर्जेदार प्राथमिक शिक्षणासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहे. दूर अंतरावरील किंवा सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागे असणाऱ्या राजस्थानमध्ये प्रामुख्याने मुलींच्या शिक्षणासाठी ही संघटना कार्य करीत आहेत.

## 10.5 जागतिक शिक्षण संस्था, डाकार 2000

या संस्थेत 155 देशांचा सहभाग असून 105 संस्थांनी काम करीत आहेत. सन 2000 मध्ये सर्वांसाठी शिक्षण परिषद झाली त्यामध्ये या संघटनांनी काम करण्याचे ठरविले आहे. मुलभूत शिक्षणासाठी अत्यावश्य असलेल्या गोष्टींवर त्यांचा भर असून बालक, युवक व प्रौढ यांना शिक्षणाची संधी मिळालली पाहिजे हा त्यांचा हेतू आहे. शिक्षणाला ठळकपणे नवी दिशा मिळावी त्याच्या गरजा, संस्कृती, शैक्षणिक वातावरण याचाही विचार केलेला आहे. जोमेतीय योजनेमध्ये या योजनेचा पुनर्विचार केलेला असून त्याला यश प्राप्त झालेले आहे. युनेस्कोने एकविसाव्या शतकातील शिक्षणासाठी चार मुख्य गोष्टीचा विचार केलेला आहे.

- माहितीसाठी शिक्षण
- कामासाठी शिक्षण
- अस्तित्वासाठी शिक्षण
- एकत्रित जगण्यासाठी शिक्षण

प्रत्येक नागरिक समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत सर्वांसाठी शिक्षण असा निर्धार डाकारच्या परिषदेमध्ये करण्यात आला.

**सर्वांसाठी शिक्षणाची उद्दिष्ट्ये :**

i) प्रामुख्याने वंचित स्तरातील बालकासाठी शिक्षणाचा विस्तार करणे.

ii) सन 2015 पर्यंत गुणवत्तापुर्ण शिक्षण मुली तसेच विविध परिस्थितीतील अल्पसंख्याकांसाठी मोफत आणि सक्तिचे उत्तम शिक्षण देणे.

iii) युवक व प्रौढांसाठी सुयोग्य शिक्षण आणि जीवन कौशल्याचे कार्यक्रम राबविणे.

iv) सन 2015 पर्यंत 50 टक्क्यापर्यंत प्रौढ साक्षरतेचे उद्दिष्ट गाठणे. मूलभूत व निरंतर शिक्षण महिला व प्रौढांपर्यंत पोहोचविणे व समान संधी देणे.

v) सन 2005 पर्यंत स्त्री–पुरुष भेदभाव कमी करणे आणि 2015 पर्यंत मुलींना पूर्ण समान व गुणवत्ता पूर्ण संधी देणे.

vi) साक्षरता, अंक वाचन जीवनकौशल्यांचे ज्ञान झाले आहे हे प्रत्यक्षात दिसून आले पाहिजे. त्यासाठी शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा झाली पाहिजे.

**जागतिक शैक्षणिक मंडळाची उद्दिष्ट्ये :**

1) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकीय घटकांना गतीशीलता देणे. राष्ट्रीय विकास आराखड्यामध्ये मूलभूत शिक्षणामध्ये गुंतवणूक करण्याची तरतूद करणे.

ii) सर्वांसाठी शिक्षण या धोरणातील विविध घटक एकमेकांच्या सानिध्याने वापर करून दारिद्र्य निर्मूलन व विकासाची व्युहरचना राबविणे.

Notes

iii) राष्ट्रीय आपत्ती, वादविवाद, अस्थिरता या काळात निर्माण होणाऱ्या समस्या मिटविण्यासाठी समजुतदारपणे, शांतता व सहनशीलतेच्या माध्यमातून सोडविणे.

iv) स्त्री–पुरुष समानता व गुणवत्तेसाठी मनोवृत्ती मूल्ये परंपरा यांचा समन्वय साधणे.

v) एच. आय. व्ही. विरुद्ध लढण्यासाठी शैक्षणिक उपक्रम तातडीने राबविणे.

vi) शिक्षकांचा दर्जा, नैतिकता व व्यवसायभिमुखता वाढविणे.

vii) सर्वांसाठी शिक्षण यासाठी माहिती व संदेशवहन तंत्राचा वापर करून उद्दिष्ट साध्य करणे.

viii) पद्धतशीरपणे सर्वांसाठी शिक्षणाच्या उद्दिष्टांसाठी रचना करून राष्ट्रीय, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय पातळी गाठणे.

जगातील अनेक देशांनी हे उद्दिष्ट गाठल्याचे दिसून येत आहे. या प्रगतीमागे आंतरराष्ट्रीय पाठबळही आहे. जे देश कमी प्रमाणात विकसित आहेत त्यानी अधिक यंत्रणा वापरणे आवश्यक आहे. डाकारच्या योजनेप्रमाणे आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक यंत्रणा राबविणे अपेक्षित आहे. त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग आवश्यक आहे. सर्वांसाठी शिक्षण सन 2000 च्या अहवालावरून लक्षात येते की सहाराजवळीच भाग, आफ्रिका, दक्षिण आशिया आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांमध्ये ही योजना राबविणे हे एक आव्हान आहे. त्यासाठी ठरलेल्या उद्दिष्ट्यांचे परिक्षण व उजळणी करणे आवश्यक आहे□

सर्वांसाठी शिक्षणामध्ये राष्ट्र हा गाभा आहे. जेथे ही योजनेला राष्ट्रीय अशांतता, नैसर्गिक आपत्ती हे आव्हान असून त्यासाठी आंतरराष्ट्रीय मदतीतून तांत्रीक सहकार्याची मदत होईल.

### कार्य 1

**दिलेल्या पर्यायातून अचूक पर्याय निवडून लिहा.**

**1.** a) जोमेतीयन परिषदेमध्ये सर्व सदस्यांचे .......... हक्कांशी एकमत होते.

i) स्त्री–पुरुष समानता

ii) प्रौढ साक्षरता

iii) प्रत्येक नागरीकासाठी शिक्षण

iv) एडस् ग्रस्त मुलांसाठी शिक्षण

b) जोमेतीयन परिषदेमधील पाच प्रमुख तत्त्वे कोणती?

c) जोमेतीयन परिषदेतील प्रमुख उद्देश कोणते?

**2.** E - 9 देश म्हणजे .......

a) ईलेक्ट्रॉनिक देश

b) आर्थिक दृष्ट्या प्रगत राष्ट्रे

c) जास्त लोकसंख्येचे देश

d) आर्थिकदृष्ट्या मागसलेले देश

**3. पुढील प्रश्न सोडवा.**

1) जोमतीयन परिषदेतून E 9 देशांना काय लाभ झाला?

2) दक्षिण आशियायी देशाची प्राथमिक शिक्षणाची स्थिती वर्णन करा.

### कार्य 2

विकसनशील व विकसित देशातील शैक्षणिक वाटचाल यावर तुमचे सहकारी आणि तज्ञांशी चर्चा करा.

--------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------

Notes

## 10.6 सारांश

- लोकांच्या शिक्षणाशिवाय देश यशस्वी होऊ शकत नाही.
- विकासाचे सातत्य व दारिद्र्य निर्मूलनासाठी शिक्षण ही किल्ली आहे.
- मूलभूत शिक्षण हा दीर्घकालीन शिक्षणाचा पाया आहे. सातत्यपूर्ण शिक्षण 21 व्या शतकातील शिक्षणाची किल्ली आहे. वय, शैक्षणिक पातळी, औपचारिक अनौपचारिक शिक्षण, शाळा आणि शाळा बाह्य शिक्षण या पलिकडचे शिक्षण असून ते विविधतेला जोडणारा दुवा आहे.

## 10.7 संक्षिप्ते रूपे

- ADEA Association for the Development of Education in Africa.
- AFDB African Development Bank
- CDF Comprehensive Development Framework
- CREMIS Caribbean Regional Educationl Management Information System
- DFID Department for International Development
- ECCD Early Childhood care and development
- EU European Union
- FRESH Focusing Resources on Effective School Health
- EFA Education for All
- HIPC Highly Indebted Poor Countries Initiative
- HIV Human Immunodeficiency Virus
- IBE UNESCO International Bureau of Education
- ICT Information and commication technologies.
- IIEP UNESCO Internaional Institute for Educational Planning
- NGO Non-governmental organization
- OIE Organization of Ibero-American States for Education, Science and Culture.
- SIDA Swedish International Development Co-operation Agency
- UNAIDS Joint United Nations Programme on HIV/AIDS
- UNDAF United Bations Development Assistance Framework
- UN/DESA United Nations Department of Economic and Social Affairs
- UNDP United Nations Development Programme
- UNESCO United Bations Educational, Scientific and Cultural Organization
- UNFPA United Nations Population Fund
- UNGEI United Nations Girls' Education Initiative
- UNICEF United Nations International Children's Emergency Fund
- WGEFA Working Group on Education for All
- WHO World Health Organization

## 10.8 संदर्भ

परिषदा आणि संबंधित कागदपत्रे

**Conference Documents and Papers**

Notes


- World Education Forum (= WEF). Dakar, Senegal, 26-28 April 2000. The Dakar Framework for Action. Education for All : Meeting our Collective Commitments. www2.unesco.org/wef/en-leadup/dakfram.shtm
- World Education Forum. Address by Koichiro Matsuura, Director General, UNESCO. www2.unesco.org/wef/en-news/coverage_speech_jihiro.shtm
- World Education Form. James D. Wolfensohn, President, The World Bank. Presentation at the WEF.

  www2.unesco.org/wef/en-news/coverage_speech_wolfen.shtm
- World Education Forum. Renewed Hope: NGOs and Civil Society in Education for All. Executive Summary (Press Release) of the NGO Study by the Press and Information Office of the Dakar Meeting (= NGO Study).

  www2.unesco.org/wef/en-leadup/findings_ngo.shtm.
- World Education Forum : NGO Declaration on Education for All, Dakar 25 April 2000. 4 pages.
- World Education Forum. Strategy Session, "Literacy for All: A Renewed Vision for a Ten-Year Global Action Plan", Dakar, 27 April 2000 and : Draft of a Resolution for a UN Literacy Decade
- World Education Forum. Statistical Document. UNESCO Instirute for Statistics, Paris 2000.
- Education for All – Global Synthesis by Malcolm Skilbeck. EFA International Consultative Forum Documents. EFA Forum UNESCO. Paris 2000.
- EFA Thematic Study on Community Partnership in Education : Dimensions, Variations and Implications, by Marc Bray. January 2000. Comparative Education Research Centre, The University of Hong Kong, Pokfulam Road, Hong Kong, China.
- EFA Thematic Study on Funding Agencies' Contributions to Education for All, by Clare Bentall, Edwina Peart, Roy Carr-Hill, and Aidan Cox. February 2000. Overseas Development Institute, London, Portland House, Stag Place, London SWIE 5DP. www.oneworld.org/odi
- EFA Thematic Study on Literacy and Adult Education. Prepared by the International Literacy Institute, Principal Author Daniel Wagner, March 2000. University of Pennsylvania – UNESCO. 3910 Chestnut Street, Philadelphia, PA 19104 – 3111. ww.literacyonline.org.
- Mid-Decade Meeting of the International Consultative Forumon Education for All, 16 – 19 June 1996, Amman, Jordan. Final Report. EFA Forum Secretarial UNESCO, Paris 1996.
- World Conference on Education for All (= WCEFA), 5-9 March 1990, Jomtien, Thailand. World Declaration on Education for All and Framework for Action to Meet Basic Learning Needs. Published by the Inter-Agency Commission UNICEF House, New York, N. Y. April 1990
- Fifth Internation Conference on Adult Education (= CONFINTEA V), 14-18 July 1997, Hamburg, Germany. Declaration on Adult Learning. UNESCO Institute for Education Hamburg 1997.


**Other Related Publication**


- Bhola, H. S., Evaluating Literacy for Development. Projects, Programs and Campaigns. UNESCO Institute for Education, Hamburg; German Foundation for International Development, Bonn 1990.

- Torres, Rosa Marfa, One Decade of Education for All : The Challenge ahead. International Institute for Educational Planning (UNESCO/IIEP), Buenos Aires 2000
- Publications on Dakar by/on the World Education Forum in the Internet under www2.unesco.org/wef
- Hard copies can be ordered from UNESCO
  -http://www.unicef.org/mdg/index_unicefsrole.htm.
- For Elementary Education initiative at International level
  - http://unesdoc.unesco.org/images/0012/00122850e.pdf


Notes

## 10.9 स्वाध्याय

1. जागतिक शिक्षण परिषदेची उद्दिष्टांची चर्चा करा.
2. UEE वर जोमेतीएन परिषदेच्या झालेल्या परिणामाबद्दल तुमचे मत काय?
3. युनेस्को आणि UEE यांचे कार्य कोणते?
4. जागतिक बँक, सीडा, डीएफ आयडी यांचे UEE मध्ये कार्य कोणते?
5. डाकार (सेनेगल) परिषद 2000 मध्ये झालेल्या जागतिक शिक्षण परिषदमध्ये झालेल्या विषयांची माहिती लिहा.